cmyk

## संपादकीय

### इथे सत्ताधाऱ्यांचीच दहशत!

विधिमंडळाच्या ठिकाणी जो आचरट आणि किळसवाणा प्रकार झाला त्याबाबत अजूनही संताप व्यक्त होत असतानाच रविवारी सत्तेत असलेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे प्रवक्ते आणि कार्यकर्त्यांनी लातूरमध्ये छावा संघटनेच्या लोकांना रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण केली. राज्याचे कृषिमंत्री भर सभागृहामध्ये ऑनलाइन रमी खेळत असल्याचा व्हिडिओ बाहेर आल्याने प्रबळ उडाली असून, याचा निषेध व्यक्त करण्यासाठी छावा संघटनेचे कार्यकर्ते सुनील तटकरे यांना निवेदन देण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांनी कृषिमंत्र्यांना घरी बसून पत्ते खेळायला सांगा, असे म्हणत त्यांच्यासमोर पत्याचा डाव टाकला.

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### देशभरात मुसळधार पावसाची शक्यता, अलर्ट जारी

मुंबई-गेल्या काही दिवसांपासून देशातील काही भागात पावसाने उघडीप घेतली होती, मात्र आता पुन्हा एकदा मुसळधार पावसाला सुरुवात होणार आहे. हवामान विभागाने दिल्ली एनसीआरमध्ये वादळी वाऱ्यांसह आणि मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. काही दिवसांपूर्वी राजधानीत झालेल्या पावसामुळे नागरिकांना उष्णतेपासून दिलासा मिळाला आहे मात्र रस्त्यांवर पाणी साचल्याने लोकांना त्रासाचा सामना करावा लागला होता. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार दिल्ली एनसीआरमध्ये वादळी पावसाची शक्यता आहे. तसेच शहराते कमाल आणि किमान तापमान ३५ आणि २६ अंश राहण्याची शक्यता आहे. २१ जुलै रोजीही वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. उद्या राजधानीत पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–८६ | सोमवार, दि.२१ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## लातूरमध्ये तटकरेंसमोर पत्ते फेकणाऱ्या छावाच्या कार्यकर्त्यांना मारहाण

# कृषीमंत्री की रम्मी मंत्री ?

### विरोधकांचा हल्लाबोल; सभागृहात माणिकराव कोकाटे जंगली रम्मी खेळतानाचा व्हिडिओ व्हायरल

**मुंबई / लातूर । प्रतिनिधी**

**कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा चक्क सभागृहात मोबाईलवर रमी गेम खेळतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. रोहित पवार यांनी हा व्हिडिओ ट्विट केल्यानंतर राजकीय वाद निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांनो विसरा हमी, खेळा रम्मी तर काही विरोधी पक्षातील नेत्यांनी माणिकराव कोकाटे हे कृषीमंत्री आहेत की रम्मी मंत्री आहेत? अशा शब्दात हल्लाबोल केला आहे. दरम्यान लातूर जिल्हा दौऱ्यावर असलेल्या सुनिल तटकरेंच्या समोर छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पत्ते फेकल्यानंतर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व त्यांच्या १० ते १५ कार्यकर्त्यांनी छावा संघटनेच्या ३ कार्यकर्त्यांना बेदम मारहाण केल्याची घटना रविवारी सायंकाळी घडली.**

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे सुरुवातीपासूनच वेगवेगळ्या कारणामुळे चर्चेत आहेत. शेतकऱ्यांविषयी त्यांनी अनेकवेळा वादग्रस्त वक्तव्य केले असून आता तर त्यांचा मोबाईलवर रमी गेम खेळतानाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. शेतीचे असंख्य प्रश्न प्रलंबित असताना, राज्यात रोज ८ शेतकरी आत्महत्या करत असताना सुद्धा काही कामच नसल्याने कृषिमंत्र्यांवर रमी खेळण्याची वेळ येत असावी. रस्ता

◀◀ पान २ वर





### “ राष्ट्रवादीचे प्रवक्ते सुरज चव्हाण यांच्याकडून दादागिरी

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्यासमोर छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पत्ते फेकत कोकाटेंचा राजीनामा घेण्याची मागणी केली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते सुरज चव्हाण यांनी आपल्या सहकाऱ्यांसह छावाच्या दोन ते तीन कार्यकर्त्यांवर हल्ला केला. यावेळी छावाचे पदाधिकारी विजयकुमार घाडगे – पाटील यांना जबर मारहाण केली. यावेळी सुरज चव्हाण यांनी अक्षरशः दादागिरी केल्याचे दिसून आले. आता पोलिस काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### “ सुप्रिया सुळेंचा कोकाटेंवर टिकास्त्र

कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंच्या रमी खेळण्याच्या व्हिडिओवर खासदार सुप्रिया सुळेंनी हल्लाबोल चढवला असून कृषिमंत्र्यांनी स्वतःहून राजीनामा द्यावा अन्यथा त्यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी सुप्रिया सुळेंनी केली आहे.

### “ कृषी मंत्री म्हणुन कोकाट्यांचे योगदान काय–संजय राऊत

खा. संजय राऊतांनी कोकाटेंवर सडकून टीका केली असून तीन महिन्यात राज्यात ६५० हून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. दोन शेतकरी लातूरहून चालत मुंबईला आले मात्र त्यांना भेटायला कृषिमंत्र्यांकडे वेळ नाही. अशा आमदारांना कृषीमत्रीपद देऊन कोणते योगदान दिले असा सवाल राऊतांनी विचारला आहे.

### “ राष्ट्रवादीला छावा स्टाईल उत्तर दिले जाईल–जावळे पाटील

लातूरमध्ये छावाच्या कार्यकर्त्यांना मारहाण झाल्यानंतर छावाचे अध्यक्ष नानासाहेब जावळे पाटील यांनी चांगलाच समाचार घेतला असून राष्ट्रवादीच्या गुंडांनी आमच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली. आता त्यांना छावा स्टाईल उत्तर दिले जाणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

### “ कोकाटेंचे दुधखुळे स्पष्टीकरण

मी खालच्या सभागृहात नेमकं काय चालले आहे, ते युट्यूबवर पाहण्यासाठी फोन सुरु केला होता. पण त्यावर कोणीतरी हा गेम डाऊनलोड केला होता, ती जाहिरात तो गेम स्कीप करत होतो, तेव्हा कोणीतरी तो व्हिडीओ काढला असेल, असे मंत्री कोकाटे म्हणाले. त्यानंतर त्यांनी तर अक्षरशः महाराष्ट्रातील जनतेला वेड्यात काढण्याचे काम केले आहे. तुमच्या मोबाईलमध्ये असे गेम येत नाहीत का? असे त्यांनी स्पष्टीकरण केले. व्हिडिओ आणि कोकाटेंचे स्पष्टीकरण यात मोठी तफावत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे कोकाटेंचे हे दुधखुळे स्पष्टीकरण असल्याचे म्हटले जात आहे.

## थोडक्यात...

### अजित पवारांच्या विधान भवनमध्ये खात्यांतर्गत बैठका

मुंबई-उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधान भवनमध्ये खात्यांतर्गत बैठका घेतल्या आहेत. या बैठकीला जिल्ह्यातील पोलीस विभाग महसूल विभागाचे अधिकारी हजर होते.

### केंद्र सरकारचे आजपासून पावसाळी अधिवेशन

नवी दिल्ली-पावसाळी अधिवेशनापूर्वी केंद्र सरकारने रविवारी सकाळी ११ वाजता एक सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. केंद्र सरकारचे पावसाळी अधिवेशन हे दि. २१ जुलैपासून दि. २१ ऑगस्टपर्यंत चालेल. या बैठकीत सरकारकडून विविध पक्षांकडून सहकार्य मिळवण्याचा प्रयत्न केला जाण्याची शक्यता आहे.

### आ.रोहित पवारांवर गुन्हा दाखल

मुंबई : राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्यावर आझाद मैदान पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आझाद मैदान पोलीस स्थानकातील पोलिसांशी गैरवर्तन केल्याप्रकरणी आणि सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आ. रोहित पवार यांचा पोलिसांशी गैरवर्तन केल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शिवशाही बसचे हिरकरणीत होणार रुपांतर

मुंबई: वाहतुकीच्या स्पर्धेत 'शिवशाही' बस अग्रगण्य ठरत होती. मात्र आता एसटीचा मोठा ब्रॅण्ड असलेली शिवशाही हळुहळू बंद होण्याच्या मार्गावर आहे. शिवशाहीचे रुपांतर हिरकणी बसमध्ये करण्यात येत आहे. शिवशाहीचे रुपांतर झालेली पहिली हिरकणी बस एसटी महामंडळाच्या ताफ्यात दाखल झाली असून लवकर प्रवाशांच्या सेवेत येणार आहे.

## ..तर त्या लाभार्थी महिलांवर होणार कारवाई?

### चिंता वाढली: मंत्री छगन भुजबळांनी स्पष्टच सांगितले

**नाशिक । प्रतिनिधी**

**ज्या कुटुंबांचे आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण ही योजना सुरू केली आहे. मात्र पात्रता नसतानाही अनेक महिला या योजनेचा लाभ घेत आहे. गाड्या आणि बंगले असताना लाडकी बहिण योजनेचा लाभ घेत असलेल्या महिलांवर येत्या काळात कारवाई होऊ शकते, अशी माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे.**

मुख्यमंत्री लाडकी बहीण या योजनेंतर्गत दर महिन्याला लाभार्थी



महिलेच्या बँक खात्यामध्ये दीड हजार रुपये जमा केले जातात. सरकारची ही एक महत्त्वकांक्षी योजना आहे, मात्र सध्या या योजनेच्या निकषात ज्या महिलांची नावं बसत नाहीत, त्या महिलांची नावं या योजनेतून वगळण्याचे काम सुरू आहे. याविषयी बोलताना मंत्री छगन भुजबळ म्हणाले,

◀◀ पान २ वर

## राष्ट्रवादीच्या मेळाव्याचा ताळ ना मेळ सगळा अवमेळ मुंडे सहा महिन्यानंतर आले आणि मैदान मारून गेले

**बीड । प्रतिनिधी**

**रविवारी शहरांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार यांच्या पक्षाचा निर्धार मेळावा झाला मात्र या मेळाव्यादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील गटबाजी पुन्हा एकदा दिसून आली स्थानिक नेत्यांनी शहरभर लावलेल्या लाखो रुपयांच्या बॅनरवर एकमेकांना टाळल्याने ही गटबाजी उघड झाली त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये कुठेच ताळ मेळ नव्हता सर्व अवमेळ होता मात्र तब्बल सहा महिन्यानंतर**



**पहिल्यांदा राजकीय व्यासपीठावर आलेल्या धनंजय मुंडे यांनी मात्र मैदान मारले हे तेवढेच सत्य.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे युवक प्रदेशाध्यक्ष महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर आदींच्या उपस्थितीमध्ये मेळावा घेण्यात आला त्यापूर्वी बीड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने जी तयारी करण्यात आली होती त्यामध्ये मात्र डॉक्टर योगेश क्षीरसागर अमर नाईकवाडे बळीराम गवते या राष्ट्रवादीच्या नेत्यांनी आपल्या बॅनर वर एकमेकांना घेणे टाळल्यामुळे गटबाजी पुन्हा एकदा दिसून आली पदाधिकाऱ्यांमध्येच हा अवमेळ असल्याने कार्यक्रम यशस्वी होणार की नाही अशी चर्चा होऊ मात्र तब्बल सहा महिन्यांनी

◀◀ पान २ वर

## चार मंत्री घरी जाणार?

### खा. संजय राऊत यांच्या ट्विटने खळबळ

**मुंबई । प्रतिनिधी**



**शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एक ट्विट केले आहे. या ट्विटमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. राऊत यांनी मोठा दावा केला असून यात राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन आणि शिंदे शिवसेनेचे दोन मंत्र्यांचा समावेश असल्याचे म्हटले जात आहे.**

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा मोबाईलवर रमी खेळत असल्याचा एक व्हिडीओ समोर आला आहे, त्यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एक ट्विट केले आहे. या ट्विटमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. चार मंत्री नक्की घरी जाणार, महाराष्ट्रात वेगवान घडामोडी लवकरच सुरू होतील! असा दावा राऊत यांनी केला आहे. ज्या मंत्र्यांना डच्चू दिला जाणार आहे, त्यात माणिराव कोकाटे, संजय सिरसाट, संजय राठोड आणि आणखी एक मंत्र्याचा समावेश असल्याचे बोलले जात आहे.

## सकारात्मक, विश्लेषणात्मक पत्रकारितेवर माध्यमांनी अधिक भर द्यावा -जिल्हाधिकारी

### बीड जिल्हा माहिती कार्यालयाकडून पत्रकारांसाठी कार्यशाळा

**बीड । प्रतिनिधी**

**समृद्ध लोकशाहीसाठी प्रसार माध्यमे, प्रशासन आणि नागरिक यांच्यात समन्वय आवश्यक आहे. नागरिक व प्रशासनात समन्वय साधण्यासाठी माध्यमे मोलाची जबाबदारी पार पाडत असतात. तरीही माध्यमांनी सकारात्मक, विश्लेषणात्मक पत्रकारितेवर अधिक भर द्यावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज येथे केले.**



शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृह येथे माहिती जनसंपर्क महासंचालनालयाच्या बीड जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने पत्रकारांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उदघाटन जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्याहस्ते झाले, यावेळी ते बोलत होते. प्रमुख मार्गदर्शक दीपक रंगारी, माध्यम तज्ज्ञ डॉ. प्रभू गोरे, प्रा. शिवशंकर पटवारी, प्र. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके यांची उपस्थिती होती. प्रथम मान्यवरांच्या हस्ते आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले, शासन, जिल्हा प्रशासन नागरिकांच्या समस्या, प्रश्न सोडाविण्यासाठी प्रयत्नशील आहे. आता जिल्हा स्तरावर होत असलेल्या जनता दरबार प्रमाणे तालुका स्तरावर देखील अधिकारी जनता दरबार घेत आहेत. जनतेचे प्रश्न, समस्या सोडवत आहेत. जनमत घडवण्याचे काम माध्यमे प्रभावीपणे करतात.

◀◀ पान २ वर

● आरोग्य विभागाची धावपळ ●

## शाळेत जाताना अचानक तीन मुलांना लुळेपणा

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातल्या खंबाटवस्ती पाथरी गावात शाळेत निघालेल्या तीन चिमुकल्यांच्या पायात अचानक शक्ती गेली आणि ते जागेवरच कोसळले. यात तीन वर्षांचा, नऊ वर्षांचा आणि अकरा वर्षांचा समावेश आहे. या घटनेमुळे पालक आणि आरोग्य यंत्रणा हादरली आहे.**

कधी काय होईल हे सांगता येत नाही. शाळेत जाताना अचानक तीन मुलांना लुळेपणा आल्याने संभाजीनगर जिल्ह्यात चांगलीच खळबळ माजली आहे. शाळेत जात असताना अचानक त्यांच्या पायातली ताकद गेली असं नातेवाईकांचे म्हणणे होते. डॉक्टरांनी हे तिन्ही रुग्ण जीबीएस संशयित असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या तपासण्या

◀◀ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

बीड, दि.१८ जुलै २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू:९.५० क्विंटल | | |
| २,४६६ | २,७५३ | २,६४६ |
| ज्वारी/हायब्रिड : ३३.०० क्विंटल | | |
| २,००१ | २,७९१ | २,३७१ |
| मका/लोकल:१०.५०क्विंटल | | |
| २,१५१ | २,१५१ | २,१५१ |
| तूर :२५.०० क्विंटल | | |
| ५,६०० | ५,६०० | ५,६०० |
| उडीद : १.५० क्विंटल | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: २८.५० क्विंटल | | |
| २,१०० | २,८२४ | २,५७५ |
| मुग: ०.५० क्विंटल | | |
| ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | | |
| ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: २.०० क्विंटल | | |
| ५,७०० | ६,१५० | ५,९२५ |

## मराठवाड्यात कोवळी पिके माना टाकू लागली

### शेतकरी चिंताग्रस्त; पावसाचा खंड पडल्याने दुबार पेरणीचे संकट

**छ. संभाजीनगर : प्रतिनिधी**

मराठवाड्यात पावसाने ओढ दिल्याने चिंता वाढली आहे. गेल्या महिनाभरापासून मराठवाड्यात पाऊस बरसलेला नाही. त्यामुळे पिके सुकू लागली आहेत. यातून आता खरीप हंगाम धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मागच्या चार दिवसांत तुरळक ठिकाणी पाऊस झाला. परंतु मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत बहुतांशी ठिकाणी पाऊसच गायब असल्याने पिकांची अवस्था बिकट झाली आहे. पावसाअभावी पिके करपत असून, पिकांची वाढही खुंटली आहे. त्यामुळे खरीप हंगाम धोक्यात येण्याची चिन्हे आहेत. याचा सर्वाधिक फटका सोयाबीन उत्पादनाला बसण्याची शक्यता



◀◀ पान २ वर

### लवकर पाऊस न झाल्यास पिके करपण्याचा धोका

मराठवाड्यात महिनाभरापासून पाऊस गायब आहे. अवकाळी पाऊस आणि जूनच्या सुरुवातीला झालेल्या दमदार पावसामुळे शेतक-यांनी लगबगीने शेतजमिनी दुरुस्त करून पेरणी उरकली. परंतु पेरणी झाल्यापासून मराठवाड्यातून पाऊस गायब झाला आहे. तुरळक ठिकाणी पावसाने हजेरी लावली. परंतु ब-याच भागाला पावसाची प्रतीक्षा आहे. पावसाअभावी पिके सुकली असून, दुपारच्या वेळी माना टाकत आहेत. त्यामुळे लवकर पाऊस न झाल्यास खरीप हंगाम वाया जाण्याची स्थिती निर्माण झाली आहे.

### आकाशात कोरडे ढग

आकाशात दिवसभर आणि रात्रीही ढग भरून येतात. परंतु ते बरसत नाहीत आणि सध्या पाऊस येण्यासारखे वातावरण नाही. त्यामुळे शेतक-यांची चिंता वाढली आहे. महाग बियाणे आणि खते खरेदी करून पेरणी केली खरी. परंतु आता पाऊसच नसल्याने चिंता वाढली आहे.

cmyk

## अग्रलेख

# इथे सत्ताधाऱ्यांचीच दहशत !

विधिमंडळाच्या ठिकाणी जो आचरट आणि किळसवाणा प्रकार झाला त्याबाबत अजूनही संताप व्यक्त होत असतानाच रविवारी सत्तेत असलेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे प्रवक्ते आणि कार्यकर्त्यांनी लातूरमध्ये छावा संघटनेच्या लोकांना रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण केली. राज्याचे कृषिमंत्री भर सभागृहामध्ये ऑनलाइन रमी खेळत असल्याचा व्हिडिओ बाहेर आल्याने प्रबळ उडाली असून, याचा निषेध व्यक्त करण्यासाठी छावा संघटनेचे कार्यकर्ते सुनील तटकरे यांना निवेदन देण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांनी कृषिमंत्र्यांना घरी बसून पत्ते खेळायला सांगा, असे म्हणत त्यांच्यासमोर पत्याचा डाव टाकला. यामुळे तिथे उपस्थित असलेले राष्ट्रवादीचे प्रवेश सूरज चव्हाण आणि कार्यकर्ते चिडले आणि त्यांनी या कार्यकर्त्यांना अत्यंत बेदम अशी मारहाण केली. लोकशाही पद्धतीने निवेदन देणाऱ्या कार्यकर्त्यांना, सत्ताधारी कार्यकर्त्यांच्या पक्षाने मारणे याला काय म्हणायचे ? राज्याच्या जनतेला सुरक्षा देणे हे शासनाचे काम आहे मात्र इथे सत्ताधाऱ्यांचीच दहशत असल्याचे दिसत आहे.

विधिमंडळात तर नाक्यावर उभे राहणाऱ्या टवाळखोरांकडून केला जातो तसला थिल्लरपणा केला गेला. केवळ दोन व्यक्ती आणि त्यांचे समर्थक यांच्यापुरती ही घटना मर्यादित नाही. त्यांनी जे केले ते संपूर्ण महाराष्ट्राला मान खाली घालायला लावणारेच होते. झालेली घटना तशी अनपेक्षितही नव्हती. हे कधीतरी घडणारच होते त्याचे कारण महाराष्ट्राच्या राजकारणाचा गेल्या पाच-दहा वर्षांत पार विचका करून टाकला आहे. सभ्यतेला आणि सुसंस्कृतपणाला न शोभणाऱ्या घटना पूर्वीही राज्याच्या राजकारणात घडल्या. मात्र असे कंबरेचेच सोडल्यासारखे प्रकार पाहायला मिळाले नाहीत. राजकारणात पात्रता नसलेल्यांनी शिरकाव केला आहे का याचा यामुळे पुन्हा एकदा विचार करण्याची वेळ आली आहे. हा विचार निवडणूक आयोग किंवा राजकीय पक्षांनी करावा असे अजिबात अभिप्रेत नाही. आयोग नियम आणि शेरेबाजीच्या पलिकडे काही करू शकत नाही हे एव्हाना स्पष्ट झाले आहे. टी. एन. शेषन जेव्हा निवडणूक आयुक्त होते त्यावेळचा दरारा कधीच संपला आहे.

राजकीय पक्ष चांगल्या लोकांना संधी देतील हेही आता कलियुगात सतीयुगातील पावित्र्याची अपेक्षा करण्यासारखेच आहे. या असल्या प्रतिनिधींना अथवा त्यांच्याकडून होणाऱ्या बेजबाबदार कृत्यांना ब्रेक लावायचाच असेल, तर तो केवळ मतदार आणि राज्यातील जनताच लावू शकते. पूर्वी राजकारणातील गुन्हेगारीकरण आणि विधिमंडळांतील कथित आखाड्याबाबत बोलताना बिहार आणि उत्तर प्रदेश या दोन राज्यांची नावे समोर येत. आता त्यांचे नाव घेतले तरी त्यांना राग येतो. बाहुबली मंडळींना राजकारणात प्रस्थापित करून पांढरे नेते करण्याचे काम या दोन राज्यांनी केले. त्यांनी अशा बाहुबलींना संसदेपर्यंतही पाठवले आणि तेथेही बाहुबलींच्या शक्तिप्रदर्शनाचे अंक पाहायला मिळाले. नव्वदचे दशक अशा घडामोडींसाठी विशेष चर्चेत होते. तथापि, ही थेरं महाराष्ट्रात नव्हती. महाराष्ट्रातील दोन्ही सभागृहांना मोठी परंपरा लाभली आहे आणि मोठे नेते या सभागृहांनी आणि राज्याच्या जनतेने पाहिले आहेत. वैचारिक मतभेद त्याकाळीही होते आणि संघर्षही होता. राज्य म्हणून विचार करण्याच्या वेळी मात्र सर्व मतभेद बाजूला सारत हे नेते एकत्रही आलेले लोकांनी पाहिले. सभागृहातील वैचारिक संघर्ष आणि तेवढ्यापुरती निर्माण झालेली कटुता नंतर परस्परांच्या घरी जाऊन मिटवण्याचा दिलदारपणाही या नेत्यांनी दाखवला आणि महाराष्ट्राने पाहिला आहे. ते सुसंस्कृत वातावरण गेल्या दशकभरात इतके गढूळ झाले आहे की विरोधकाला दुसऱ्या टोळीचा गँगस्टर समजून त्याचा गेमच करायचा अशा अविर्भावात गोष्टी घडवल्या जाऊ लागल्या आहेत. मुळात आज स्थिती अशी झाली आहे की, नेत्यांनाच ते कोणत्या पक्षात आहेत आणि त्यांची विचारधारा कोणती आहे याची खात्री नाही. तेथेच एवढा अंधार असेल, तर खाली कार्यकर्त्यांपर्यंत काय झिरपणार? बरे सगळेच कार्यकर्ते गुन्हेगारी पार्श्वभूमीचे नसतात, मात्र आता ज्याचा दप्तरी रेकॉर्ड आहे त्याला पावन करून घेतले जात असल्यामुळे राजकारणात लवकर वर जाण्यासाठी याच मार्गाचा वापर सुरू झाला आहे. प्रस्थापित, जबाबदार पदावर असलेले नेते त्यांच्या पदाला आणि उंचीलाही न शोभणारी भाषा जाहीर सभांमध्ये बोलत आहेत. जाहीर शिवीगाळ आणि अरेरावी रोजचीच झाली आहे. नेत्यांच्या कुटुंबातील महिलांविषयी आक्षेपार्ह टिप्पण्या होतात. विधिमंडळांच्या पायऱ्यांवर बसून अश्लील आणि अवमानकारक शेरेबाजी परस्परांवर केली जाते. सभागृहातही नावे न घेता परस्परांवर अत्यंत खालच्या शब्दांत टिप्पणी केली जाते आहे. बुवा-जादू टोणा सगळे प्रकार नेत्यांकडून सर्रास केले जात आहेत. कोणत्या महाराष्ट्रात ही मंडळी राहत आहेत आणि त्यांना नक्की कुठे हा महाराष्ट्र नेऊन ठेवायचा आहे? एखादा मुद्दा पटला नसेल आणि तो खोडून काढायचा असेल तर तुम्हाला तुमचा मुद्दा शांतपणे मांडता आला पाहिजे. ते सगळेच कधीचेच गुंडाळून ठेवले आहे. बरे राजकीय हिशेब चुकते करण्याच्या इर्षेत सर्वसामान्य नागरिकांनाही जात आणि भाषेचा वापर करून, पुरोगामी-प्रतिगामी ठरवून परस्परांच्या विरोधात उभे करण्याचा अघोरी प्रकारही पाहायला मिळाला. महाराष्ट्र हा महाराष्ट्रच राहू द्यावा. या राज्याने देशाला कायमच दिशा दिली आहे आणि प्रगतीशील विचार दिला आहे. मतांच्या राजकारणासाठी आणि विरोधकांवर जरब बसवण्यासाठी गुंडापुंडांना पाठबळ देऊन आणि त्याचे पवित्र ठिकाणी ओंगळ दर्शन घडवून राज्याला मान खाली घालण्याची वेळ हे सत्ताधारी आणत आहेत.

# पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळीत भाजपचा सामाजिक सेवा सप्ताह

## २१ ते २७ जुलै दरम्यान विविध सामाजिक उपक्रम; सेवा सप्ताहाचे उद्या उदघाटन

परळी वै. । प्रतिनिधी

**राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल, पशुसंवर्धन,मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित २१ ते २६ जुलै दरम्यान शहरात सामाजिक सेवा सप्ताह राबविण्यात येणार असून या अंतर्गत विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे उदघाटन उद्या सोमवारी होत असून सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांनी केले आहे.२१ तारखेला सकाळी ११ वा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या अरुणोदय मार्केट मधील संपर्क कार्यालयात सेवा सप्ताहातील उपक्रमांचे उदघाटन होणार आहे.**

२१ ते २७ जुलै - आधार कार्ड अपडेट,प्रधानमंत्री आवास योजना, अर्बन २.० घरकुल नोंदणी बारा बलुतेदारांसाठी विश्वकर्मा योजना नोंदणी स्थळ : पंकजाताई यांचे संपर्क कार्यालय, परळी वै.,ऊसतोड कामगार महिलांची आरोग्य तपासणी- स्थळ : उपजिल्हा रुग्णालय, मंगळवार २२ - रक्तदान शिबीर सकाळी ९ ते दुपारी ५ पर्यंत पंकजाताई यांचे संपर्क कार्यालय, बोधीवृक्ष वृक्षारोपण स.९.३० वा. स्थळ : भिमवाडी, स.१०.३० वा. स्थळ : हनुमान नगर,बुधवार २३ जुलै - सकाळी ९ वा. छत्री वाटप व कापडी पिशवी वाटप, सकाळी ११ वा., वह्या वाटप स.११.३० वा. माध्य. आश्रम शाळा, शिवाजी नगर, व१२ वा. विलाल उर्दू प्रा. शाळा, हमालवाडी येथे गुरुवार २४ जुलै - नेत्र तपासणी व मोतीबिंदु शस्त्रक्रिया मोफत आरोग्य तपासणी रक्त तपासणी, बीपी, ईसिजी, शुगर,कोलेस्ट्रॉल मोफत तपासणी वेळ : सकाळी १० ते दु. ५ स्थळः उपजिल्हा रुग्णालय, परळी, चित्रकला स्पर्धा वेळ स.९ वा.स्थळ :



जिजामाता उद्यान, युवकांसाठी स्पर्धा परिक्षा करिअर व्यक्तिमत्व विकास मार्गदर्शन शिबीर ॲड. राहुल नावंदर (छत्रपती संभाजीनगर) वेळ : सकाळी ११ वा.स्थळ : वैद्यनाथ महाविद्यालय, परळी वै. शुक्रवार दि. २५ जुलै २०२५:ना. ताईसाहेबांच्या दिर्घायुष्यासाठी होम हवन,निवासी विद्यार्थ्यांसाठी भोजन स्थळः आर्य समाज गुरुकुल, नंदागौळ रोड.सकाळी ९ वा.शालेय विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व वह्या वाटप स्थळ :वेळ सकाळी १०.३० सरस्वती विद्यालय, परळी वै. जिल्हा परिषद शाळा, परळी वैजनाथ.वेळ सकाळी ११. शनिवार दि. २६ जुलै २०२५ सकाळी ७ वा. श्री वैद्यनाथ प्रभुस अभिषेक स्थळ पंचम ज्योर्तिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिर, परळी वै.,सकाळी ७.३० वा. श्री शनैश्वर मंदिर येथे महाआरती स्थळ : श्री वैद्यनाथ मंदिर पायथ्याशी, परळी वै. सकाळी ८ वा. सुगंधकुटी बौध्द विहार येथे बुध्दवंदना स्थळः भिमनगर, परळी वै.सकाळी ८.३० वा. हुसेन शहावली दर्गा चादर चढवणे स्थळः बंगला गल्ली, परळी वै. सकाळी ९ वा. अन्नपूर्णा देवी महाआरती स्थळः श्रीरामदत्त मंदिर (बालाजी मंदिर), परळी वै.सकाळी १० वा. रुग्णाना फळे वाटप- स्थळ उपजिल्हा रुग्णालय, परळी वैजनाथ.सकाळी ११ वा. महिला स्वच्छता कर्मचारी सन्मान स्थळ पंकजाताई संपर्क कार्यालय, परळी वै.सकाळी ११.३० वा. सुकन्या समृध्दी योजना नोंदणी स्थळ : पंकजाताई संपर्क कार्यालय, परळी वै.सकाळी १२ वा. शालेय विद्यार्थ्यांना ड्रेस/वही वाटप स्थळ : वैद्यनाथ शाळा/ज्ञानबोधिनी शाळा, गणेशपार, परळी वै. रविवार दि. २७ जुलै २०२५ सकाळी ११ ते दुपारी कॅन्सर रोग निदान शिबीरतज्ञ डॉक्टर्स डॉ. शैलेष अग्रवाल(तोंड व घसा कर्करोग तज्ञ, छत्रपती संभाजीनगर), डॉ. उत्पल गायकवाड (रेडियेशन कर्करोग तज्ञ छत्रपती संभाजीनगर), डॉ. केतन शिरसाट, (मेडिकल ऑनकोलॉजिस्ट, छत्रपती संभाजीनगर) स्थळ : वेदांत होमिओ क्लिनीक, नाथ रोड, औद्योगिक वसाहत कॉम्प्लेक्स,परळी. भविष्याची दिशा युवा शक्तिचा सन्मान ग्रामीण तरुणांचे भविष्य, समस्या, संधी आणि संघर्ष प्रमुख वक्ते विलास बडे सहाय्यक संपादक, न्युज १८ लोकमत वेळ सकाळी ११ वा. स्थळ : लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर, परळी वैजनाथ. या सामाजिक सेवा सप्ताहात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांनी केले आहे.

# औद्योगिक वसाहतीतील वीज समस्या सुटणार!

जालना । प्रतिनिधी

**औद्योगिक वसाहतीतील सतत वाढणाऱ्या वीज समस्यांवर ठोस उपाययोजना करण्यासाठी जालना लघु उद्योग भारतीच्या पुढाकाराने शनिवारी ( ता.२०) आय. सी. टी. महाविद्यालयात महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत विशेष बैठक घेण्यात आली.**

> **प्रत्येक महिन्यास बैठक!**
> औद्योगिक वसाहतीतील वीज समस्यांबाबत प्रत्येक महिन्यातून एक बैठक घेऊन तक्रारी व प्रगती यांचा आढावा घेण्याचा प्रस्ताव यावेळी उद्योजकांनी मांडला.त्यास मुख्य अभियंत्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. तथापि औद्योगिक वसाहतीतील वीज समस्यांवर तोडगा निघेल, अशी अपेक्षा लघु उद्योग भारतीचे अध्यक्ष पंकज कासलीवाल यांनी व्यक्त केली.

छत्रपती संभाजीनगरचे मुख्य अभियंता कछोड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत लघु उद्योग भारतीचे अध्यक्ष पंकज कासलीवाल यांच्या सह पदाधिकारी, सदस्य आणि महावितरणचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. लघु उद्योग भारतीच्या वतीने जीर्ण वीज प्रणालीमुळे उत्पादनावर गंभीर परिणाम होत असून, यावर तातडीने उपाय आवश्यक आहे. यासह उद्योगांना भेडसावणाऱ्या समस्या मुख्य अभियंत्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. तसेच दिलेल्या लेखी निवेदनात जीर्ण वीज पायाभूत सुविधांचे नूतनीकरण करावे, - ट्रान्सफॉर्मरची संख्या वाढवून नियमित देखभाल दुरुस्ती करावी, ओव्हरहेड वायरींग ऐवजी भुमीगत केबल टाकण्यात यावे, अतिरिक्त औद्योगिक वसाहत टप्पा- ०३ मध्ये नवीन ३३/११ के. व्ही.उपकेंद्र उभारून स्वतंत्र अभियंता व उप-विभाग स्थापन करावा, नवीन कनेक्शन प्रक्रिया सुलभ करण्यासह तक्रार निवारण व फॉल्टसाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी अशा मागण्या करण्यात आल्या. मुख्य अभियंता कछोड यांनी सर्व मागण्या गांभीर्याने ऐकून घेत लवकरच संबंधित विभागांच्या सहकार्याने सकारात्मक उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

# बौध्द महासभा अध्यक्षपदी येडे तर सरचिटणीसपदी डॉ.राहुल बागुल

अंबड । प्रतिनिधी

**भारतीय बौद्ध महासभा अंबड तालुका कार्यकारिणी आज दिनांक २०/७/२५ रोजी ज्ञानभूमी ता अंबड येथे पूजनीय भंतेजी राजरत्न, आद. जिल्हाध्यक्ष महेंद्र बनकर यांच्या प्रमुख उपस्तिथीत व माजी तालुकाध्यक्ष तथा जिल्हा पर्यटन उपाध्यक्ष आद. शिवाजीराव गाढेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन तालुका अध्यक्ष म्हणून बौद्धाचार्य उत्तमराव येडे,**



**सरचिटणीसपदी डॉ राहुल बागुल तर कोषाध्यक्षपदी भास्करराव गाडगे यांची निवड करण्यात आली.**

यावेळी महिला विभागाच्या जिल्हाध्यक्षा आद. ज्योती ताई खरात, मेजर रवींद्र पचांग,जिल्हासरचिटणीस भास्कर साळवे, प्रभारी पोलीस अधिकारी चंद्रकांत दिलपाक, लक्ष्मण कोळे, भिमराव बनसोडे, आदीची प्रमुख उपास्थिती होती. उर्वरित कार्यकारिणी मध्ये तालुका संस्कार उपाध्यक्षपदी प्रा,रमेश जोगदंड,तालुका संरक्षण उपाध्यक्ष पदी विनोद जाधव, तालुका पर्यटन उपाध्यक्ष पदी संदीप मगरे यांच्यासह सुनिल खरात, सुनिल येटाले, रामदास जी वाढवे, मुक्ताराम मगरे आदी पदाधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे.

## पान १ वरून...

### कृषीमंत्री की रम्मी मंत्री?

भरकटलेल्या या मंत्र्यांना आणि सरकारला पिकविमा-कर्जमाफी-भावांतरची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांची कभी गरीब किसानो कीं खेतीपर भी आओ ना महाराज ही आर्त हाक ऐकू येईल का? असा सवाल रोहित पवारांनी विचारला आहे. आमदार रोहित पवार यांनी त्यांच्या एक्स हँडलवरून हा व्हिडीओ पोस्ट केला होता. यानंतर सध्या आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी उडताना दिसत आहे. रम्मी मास्टर कृषीमंत्री, शेतकऱ्यांनो विसरा हमी, खेळा रम्मी, असा खणखणीत टोला विरोधकांकडून लगावला जात आहे. सध्या विरोधकांकडून कृषीमंत्र्यांवर चौफेर हल्ला सुरु आहे. आ. जितेंद्र आव्हाड यांनी कोकाटे यांच्यावर जोरदार टिका केली आहे. राज्याचे कृषीमंत्री हे कृषीचे मंत्री आहेत की रम्मी मंत्री आहेत? असा प्रश्न उपस्थित केला आहे. दरम्यान रविवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे हे लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. यावेळी पत्रकार परिषद सुरु असताना छावा संघटनेचे काही कार्यकर्ते त्या ठिकाणी आले व त्यांनी मंत्री कोकाटे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच तटकरे यांच्यासमोर त्यांनी पत्ते फेकले. त्यांनतर राष्ट्रवादी युवक काँगेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण आणि त्यांचे १५ ते २० कार्यकर्त्यांनी छावाच्या दोन ते तीन कार्यकर्त्यांना जबर मारहाण करीत शिविगाळ केली. त्यामुळे दोन्ही गटात तुफान राडा झाल्यानंतर वातावरण तणावाचे होते. दरम्यान सुनिल तटकरे यांना यासंदर्भात प्रसार माध्यमाने विचारणा केली असता, ते म्हणाले, मी या घटनेचे समर्थन करणार नाही, हा प्रकार निंदणीय असून योग्य ती कारवाई पोलिसांनी करावी, असे ते म्हणाले.

-------------

### राष्ट्रवादीच्या मेळाव्याचा ताळ

राजकीय व्यासपीठावर आलेल्या धनंजय मुंडे यांनी याला शोभा वाढवली आणि धनंजय मुंडे यांच्या नियोजनामुळे बीड येथील कार्यक्रम यशस्वी झाल्याचे दिसून आले ज्या प्रभारीकऱ्यांनी शहरभर लाखो रुपये खर्चून बॅनरबाजी केली त्यांच्या मागे कार्यकर्ते कमी दिसून आले राष्ट्रवादीतील या अवमेळामुळे काही वेळ नेतेही स्तब्ध झाले होते मग त्यांनी पदाधिकाऱ्यांना पदाचे वाटप करून खुश करण्याचे काम केले असे असताना राष्ट्रवादीवर पकड असलेले धनंजय मुंडे यांनी मात्र मूठ बांधण्याचे काम करताना आपल्या खास शैलीत भाषण करत त्यांनी मैदान मारले निर्धार नवपर्वाचा मेळाव्यात धनंजय मुंडे यांनी आपण २०० दिवसांपासून काहीच बोललो नसल्याचा उल्लेख यावेळी केलं. तसेच तुमचं वैर माझ्याशी होतं तर बीड जिल्ह्याला बदनाम का केलं? असा सवालही त्यांनी आपल्या विरोधकांना केला.''मी सुनील तटकरे यांना विनंती केली होती की, मला आज भाषण करायचं नाही. कारण सांगितलं नाही. पण तुमच्यासमोर कारण सांगावं लागेल. इथे बोलावं की मैदानात बोलावं? हा प्रश्न माझ्या मनात होता. म्हणून आज आपल्या सर्वांची क्षमा मागून, इथे आपण ज्या कामासाठी आलो ते काम आपल्याला माहिती आहे. आजपर्यंत ते करत आलो तेही आपल्याला माहिती आहे. पण आज सुनील तटकरे निर्धार नवपर्वाच्या निमित्ताने आपल्या सर्वांना एकत्रित करुन बीडने आगळावेगळा इतिहास संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या इतिहासाला दाखवावा, याच अपेक्षेने ते आले आहेत. आपण सर्वजण मिळून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बीड जिल्ह्याप्रती असणारी अपेक्षा नक्कीच पूर्ण करु हे वचन आपण सुनील तटकरे यांना देऊयात'', असं आवाहन धनंजय मुंडे यांनी कार्यकर्त्यांना केलं. 'बऱ्याच दिवसांनी बोलतोय. न बोलण्याची डबल सेंच्युरी माझी झाली आहे. २०० दिवस न बोलता काढले. या २०० दिवसांत ज्या ज्या गोष्टी झाल्या त्यापैकी एक गोष्ट मला नक्कीच जिव्हारी लागली, आणखीदेखील आहे, ती म्हणजे आपल्या बीड जिल्ह्याची बदनामी. ज्यांनी कुणी केली, भलेही बीडच्या मातीतला असेल किंवा बाहेरचा असेल, त्याला एवढंच सांगायचं आहे. वैर माझ्याशी होतं तर माझ्या मातीची बदनामी का? त्यांना एवढंच सांगणं आहे. बरे झाले दिला अंधार तू मला इतका, एक ठिणगी आत लागली दिसाया. ज्यांनी ज्यांनी बाहेरुन येऊन या जिल्ह्यात मधल्या काळात अशा पद्धतीने बदनामी केली त्यांच्याप्रती हा शेर मी म्हणेन - तुम्हारी सोच के साचे में ढल नहीं सकता, जुबान काट लो बदल नहीं सकता, अरे जीवन काट लो ये लोहा पिघल नहीं सकता'', अशी शेरेबाजी करत धनंजय मुंडेंनी भूमिका मांडली. जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्षासह इतर पदाधिकाऱ्यांमध्ये कोणताच सुसंवाद नव्हता कसलाच ताळमेळ नसल्यामुळे कार्यक्रम कसाबसा पार पाडला परंतु त्याला रंगत आणली ती माजी आ मंत्री धनंजय मुंडे यांनी कार्यक्रमानंतर त्यांच्याच नावाच चर्चा सर्वच पदाधिकाऱ्यांमध्ये सुरू होते.

------------

### ..तर त्या लाभार्थी महिलांवर

अगोदरच सांगितले होते, ज्यांच्याकडे गाड्या आहेत, बंगले आहेत त्यांच्यासाठी ही योजना नाही. योजना ही नेहमी गरिबांसाठी असेत, ही योजना श्रीमंतांसाठी नसते. मी पण सांगितले होते की, ज्या महिला नियमांमध्ये बसत नाही, त्यांनी स्वतःहून सांगावं मी या नियमांमध्ये बसत नाही. एवढे करूनही ही मंडळी या योजनेचा लाभ घेत असतील तर ते अडचणीचे आहे. अजूनही गाडी बंगले असतील त्यांनी या लाडक्या बहीण योजनेतून माघार घ्यावी. योजनेत बसत नसतानाही ज्यांनी लाभ घेतला त्यांच्यावर अजून काही कारवाई होऊ नये यासाठी मी प्रयत्न करेल. जे या नियमांमध्ये बसत नाही, त्यांनी कृपा करून थांबावे. खरोखरच त्यांना आवश्यकता आहे त्यांना न्याय मिळेल, असे भुजबळ यांनी म्हटले आहे.

------------------

### शाळेत जाताना अचानक

सुरू आहेत. जीबीएस हा न्यूरोलॉजिकल डिसऑर्डरचा एक प्रकार आहे, ज्यामुळे स्नायू कमकुवत होतात, हाताला मुंग्या येतात आणि अशक्तपणा जाणवतो. आरोग्य यंत्रणेने गावातील नळ योजनेद्वारे होणाऱ्या पाणी पुरवठ्याचा वापर तात्काळ थांबवण्याच्या सूचना दिल्या आहेत. या घटनेमुळे जीबीएस आजाराची भीती वाढली आहे. या आजारातून बरे होणे रुग्णाच्या प्रतिकारशक्तीवर अवलंबून आहे. असे आजार होऊ नयेत यासाठी काळजी घेण्यावर भर देणे महत्त्वाचे आहे.

-------------------

### सकारात्मक, विश्लेष्णात्मक पत्रकारितेवर

त्यामुळे आजच्या नवमाध्यमाच्या युगात आणि समाज माध्यमांचा वाढता प्रभाव लक्षात घेता सत्य माहिती जनतेला देण्याची जबाबदारी माध्यमांना पार पाडावी लागणार आहे. तसेच नागरिकांना त्यांच्या कर्तव्याप्रती जागरूक करण्याची जबाबदारीही माध्यमांनी पार पाडणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले. आजच्या या कार्यशाळेतून पत्रकारांसाठी असलेल्या शासनाच्या योजना, सवलत, सोयी सुविधा यांची माहिती होण्यास उपयोग होईल, त्याचाही पत्रकारांनी लाभ घ्यावा, असेही जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. श्याम टरके यांनी केले. आभारही त्यांनीच मानले. कार्यशाळेबाबत प्रातिनिधिक स्वरूपात संपादक बाळासाहेब फपाळ यांनी मनोगत व्यक्त केले. तज्ज्ञांचे मार्गदर्शन माहिती आणि महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित पत्रकारांसाठी कार्यशाळेत तज्ज्ञांनी पत्रकारांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता, प्रमाणभाषा लेखन, समाज माध्यमांसाठी लेखन कौशल्ये याबाबत मार्गदर्शन केले. प्रा. रंगारी यांनी 'वृत्त संकलन आणि संपादनात शुद्धलेखनाचे महत्त्व' याविषयी मार्गदर्शन केले. मराठी प्रमाणभाषेच्या शुद्धलेखनाचे नियम, शब्दांचा अर्थ, भाषेतील व्याकरणाचा वापर याबरोबरच मराठी भाषा समृद्ध करण्यात विविध साहित्यिकांनी दिलेल्या योगदानाविषयी माहिती दिली.वाक्यामध्ये येणारी क्रियापदे, शब्दयोगी अव्यय, ऱ्हस्व, दीर्घ, ईकारांत याबरोबरच एकाक्षरी क्रियापद, शब्दयोगी अव्यय, तत्सम आणि तद्भव शब्दांविषयीचे स्पष्टीकरण उदाहरणासह समजावून सांगितले. पत्रकाराने शब्दकोश आणि लेखनकोश याचा वापर करून निर्दोष लिखाण याविषयी मार्गदर्शन केले. विविध शब्दांच्या वाक्यानुसार आणि वेळेनुसार होणारा बदलही त्यांनी उदाहरणासह स्पष्ट केले. अधिस्वीकृती नियमावली, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना, शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी या विषयांवर प्र.जिल्हा माहिती अधिकारी डॉ.टरके यांनी माहिती दिली. समाज माध्यमांसाठी लेखन कौशल्ये या विषयांवर डॉ. गोरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. संक्षिप्तता, थेट आशय, छोटी वाक्ये, शब्दांचे महत्त्व, योग्य मथळा, सातत्याने समाज माध्यमावर लिहा, योग्य हॅशटॅग, थंबनेल, ग्राफिक्स, भाषा आणि टोन आदी बाबींवर मार्गदर्शन केले. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता याविषयावर प्रा. पटवारी यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता पूर्वीची पत्रकारिता, भाषा, कला, शास्त्र, संस्कृती, राष्ट्रीय -प्रादेशिक वृत्तपत्रे यांची स्थिती आणि सद्यस्थितीत वापरात येत असलेली सॉफ्टवेअर, ॲप्स आदीबाबतीत सविस्तर माहिती दिली. या कार्यशाळेसाठी पत्रकारांच्या संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी, शहरासह, जिल्ह्यातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

------------

### मराठवाड्यात कोवळी

निर्माण झाली आहे. पावसाअभावी मराठवाड्यातील बहुतांश भागांत कोवळी पिके सुकत आहेत. लाखो हेक्टरवरील पिके धोक्यात आली आहेत. हिंगोली जिल्ह्यात पंच्याऐंशी टक्के पेरण्या झाल्या असल्या तरी पावसाच्या कमतरतेमुळे पिकांची वाढ खुंटली आहे. मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, बीड जिल्ह्यांमध्ये हीच परिस्थिती आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी पावसाने हजेरी लावली. यासोबतच बीड, लातूरममध्येही तुरळक ठिकाणी साधारण पाऊस झाला. परभणी, नांदेड, हिंगोलीमध्येही काही ठिकाणी पावसाने हजेरी लावली. परंतु या पावसाने पिकाला आधार मिळालेला नाही. त्यामुळे हलक्या, सर्वसाधारण शेत जमिनीवरील पिके हातातून जाण्याच्या अवस्थेत आहेत. कारण दुपारच्या उन्हात पिके माना टाकत असून, पाऊस नसल्याने पिकाच्या वाढीवर परिणाम झाला आहे.पावसाने पाठ फिरविल्याने धाराशिव, लातूर जिल्ह्यात खरीप पिकांवर संक्रांत आली आहे. शेतक-यांनी कोळपणी, पेरणीसाठी प्रचंड खर्च केला. महाग बियाणे, खत, किटकनाशक, फवारणी यासाठी मोठा खर्च करूनही सोयाबीन आणि इतर खरीप पिके पदरात पडणार का, अशी स्थिती निर्माण झाली आहे. आधीच महागाई त्यात शेतीतून उत्पन्न हाती न लागल्यास खर्च कसा भरून काढायचा याची चिंता शेतक-यांना भेडसावत आहे. यासोबतच पाऊस न झाल्यास पिण्याच्या पाण्याचीही समस्या भेडसावण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतक-यांसह सर्वांचेच लक्ष ढगाकडे लागले आहे. परंतु आकाशात कोरडे ढगच जमा होत आहेत.


### टी.सी.हरवला आहे

प्रज्योत महेश पुरी रा.अंबड ता.अंबड जि.जालना याची संत रामदास कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय घनसावंगी या महाविद्यालयाची बी एस्सी तृतीय वर्ष पासची टी.सी प्रवासा दरम्यान हरवली आहे. तरी ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

-::संपर्क::-

मो.८५५७८९९५६४

cmyk

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



माजलगाव:-रिपब्लिकन सेनेच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी विजय (दादा) साळवे यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करुन शुभेच्छा देताना जेष्ठ नेते दयानंद भाऊ स्वामी, जेष्ठ नेते कचरु तात्या खळगे,डॉ.मुजीब सौदागर,शहाजी टमके,पत्रकार महेंद्र मस्के,पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे,भाई जकेर पटेल, सिताराम क्षिरसागर,ॲाड विजयकुमार टमके व टि.आर.जावळे



# आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत भगवा फडकविण्यासाठी कामाला लागा -संपर्कप्रमुख मोरे

वडवणी । प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी व आगामी काही महिन्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत शिवसैनिकांनी जिल्हा परिषद सदस्य,पंचायत समिती सदस्य होण्यासाठी कामाला लागावे व शिवसेनेचा भगवा फडकवावा असे आव्हान वडवणी येथे बचत गट भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या माजलगाव विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, शिवसैनिकांच्या आढावा बैठकीच्या वेळी बोलताना संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे हे म्हणाले आहेत.



शिवसेनेची वडवणी येथे माजलगाव विधानसभा मतदारसंघाची बैठक

आगामी जिल्हा परिषद,पंचायत समितीच्या निवडणुकीत भगवा फडकवण्यासाठी माजलगाव मतदार संघातील पदाधिकारी, शिवसैनिकांची वडवणी बचत गट भवन येथे व्यापक बैठकीचे आयोजन काल दि. १९ जुने रोजी करण्यात आले होते यावेळी प्रथम छत्रपती शिवाजी महाराज व स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख उपस्थिती म्हणून संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे शिवसैनिकांना संबोधित करताना म्हणाले की बीड जिल्ह्यामध्ये शिवसेनेचे काम नंबर एक करण्यासाठी जिल्हाप्रमुखांनी आपल्या स्तरावर, तालुका प्रमुख यांनी आपल्या स्तरावर,पदाधिकारी, शिवसैनिकांनी गाव स्तरावर पक्षाची ध्येय धोरणे व शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे साहेब यांचे विचार पोहोचण्यासाठी काम करावे तसेच गाव तिथे शाखा घर तेथे शिवसैनिक तयार करावा व शाखाप्रमुख यांची नियुक्ती करावी तसेच सदस्य नोंदणी करण्यात यावी व या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी पूर्ण ताकतीने आम्हाला लागावे व शिवसेनेचा भगवा फडकवा तसेच सामान्य शिवसैनिक जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य झाला पाहिजे यासाठी संघटना बळकट करावी असे विचार व्यक्त केले यावेळी बैठकीला जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप,सचिन भैय्या मुळूक, रविराज बडे, योगेश नवले,वडवणी तालुकाप्रमुख माऊली बापू गोंडे, माजलगाव तालुका प्रमुख तुकाराम बापू येवले,धारूर तालुकाप्रमुख नारायण कुरुंद, रामदास भाई ढगे,संदीप माने,बालासाहेब बादाडे, प्रताप मात्रे,प्रकाश पवार,अशोक राठोड ,हनुमंत शिंदे,पापा सोळुंके ओमराजे जाधव, आनंद देवडकर,माऊली मोरे, पोपट शिंदे, बालासाहेब शेंडगे,गोरख चव्हाण, सुनील घाटुळ, रमेश कुरकुटे,शिवाजी सावंत,दत्ता सावंत, उपळी सरपंच सचिन हाळकर.यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

## थोडक्यात...



### छत्रपती शिवाजी विद्यालयात शैक्षणिक साहित्याचे वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

येथील छत्रपती शिवाजी प्राथमिक विद्यालयातील ५० विद्यार्थ्यांना तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप शनिवार दि.१९ जुलै करण्यात आले. यावेळी संस्थेच्या संचालिका डॉ.योगिता होके पाटील, तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचे मार्केटिंग विभाग प्रमुख जयश्री कुहिरे,ऑपरेशन मॅनेजर लक्ष्मण पवार,ज्युनिअर ऑफिसर कल्याण कुरे यांची उपस्थिती होती. तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटच्या वतीने छत्रपती शिवाजी प्राथमिक विद्यालयातील ५० विद्यार्थ्यांना शालेय दफ्तर, वही, पेन, पेन्सिल, खोडरबर या साहित्याचे वाटप करण्यात आले. विविध शाळेतील दहा हजार विद्यार्थ्यांना शालेय वेलकम किट वाटप करण्यात येणार असल्याचे ऑपरेशन मॅनेजर लक्ष्मण पवार यांनी यावेळी सांगितले. यावेळी मुख्याध्यापक मनोज सोळंके, भास्कर पारगावकर, शेख इशरत, मंजुषा गाजरे, कैलास कदम, शेख समीना, रविकुमार साळवे, बालासाहेब झोडगे, अनंत शेजुळ यांची उपस्थिती होती.

### चुंबळी गावातील कामात भ्रष्टाचार करणाऱ्यावर कारवाई करा - नागरगोजे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील एकेकाळी आदर्श गाव असलेल्या चुंबळी गावाला आता पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. नाल्या, रस्ते अशा कामांत अपहर झाला आहे. हा भ्रष्टाचार करण्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र किसानसभेचे उपाध्यक्ष महादेव नागरगोजे यांनी पाटोदा तहसीलदार मार्फत जिल्हाधिकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. तक्रारीत म्हटले आहे की, चुंबळी गावात जलस्वराज, जलधारा, वॉटर फिल्टर, जलजीवन, अशा पाणीपुरवठ्याच्या योजना आल्या. त्याचबरोबर रस्ते खोदले, टाक्या बसवल्या, परंतु लोकांना पाणी मिळाले नाही. गावातील हनुमान नागरगोजे यांचे घर ते पुलापर्यंत केलेला सिमेंट रस्ता उखडलेला आहे. गावातील चार बुरुज पासून ते दिनकर नागरगोजे यांच्या घरापर्यंत केलेले ब्लॉक आणि रस्ता उखडला आहे. गावातील नालीचे बांधकाम करून त्यावर टाकलेला स्लॅबही उखडला आहे,विशेष म्हणजे हे काम वित्त आयोगातून तीन महिन्यापूर्वीच केले आहे. शाळेतील विद्यार्थ्यांकरता चौदाव्या वित्त आयोगातून केलेला वॉटर फिल्टर प्लांट धुळखात पडला आहे. गावात दूषित पाण्यामुळे ग्रामस्थांना विविध आजार जडत आहेत, त्यामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून ग्रामीण पाणीपुरवठा योजनेत नागरगोजे वस्ती व केदार वस्ती या ठिकाणी विहिरी खोदल्या मात्र त्या सध्या अस्तित्वात नसल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहेत. आठ मे २०२४ रोजी सरपंच, सदस्यात बैठक झाली, परंतु सांडपाण्यावर चर्चा झाली नाही. चौदाव्या व पंधराव्या वित्त आयोगातून सन २०१७ ते १८ ते आजपर्यंत झालेल्या कामाची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी या तक्रारीतून करण्यात आली आहे.

### वंचित बहुजन आघाडीच्या परळी संपर्क कार्यालयाचे आज उद्घाटन

परळी । प्रतिनिधी




वंचित बहुजन आघाडी व युवा आघाडी - व तालुका परळी वैजनाथ यांच्या पुढाकाराने परळी शहरात वंचित बहुजन आघाडी संपर्क कार्यालयाचे उद्घाटन उद्या दिनांक २१ जुलै रोजी जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे व जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष गौतम साळवे व युवा तालुका अध्यक्ष राजेश सरवदे यांनी दिली आहे. शहरातील जिजामाता उद्यान, गाळा क्र. १६, परळी वैजनाथ येथे दिनांक सोमवार, २१ जुलै २०२५ वेळ: दुपारी २:०० वाजता हे भव्य उद्घाटन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे यांच्या हस्ते तसेच जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांच्या हस्ते होणार आहे.हे कार्यालय परळी तालुक्यातील समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी कार्यकर्ते व नागरिकांना संपर्क साधता यावा यासाठी वंचित बहुजन आघाडी तालुका परळी व युवा आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात येत आहे. या उद्घाटन कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे तालुका व शहर तसेच युवा पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन तालुका अध्यक्ष गौतम साळवे व युवा तालुका अध्यक्ष राजे सरवदे यांनी केले आहे.

## चौसाळा येथील हनुमान मंदिर व महादेव मंदिराचा जीर्णोद्धार

चौसाळा । प्रतिनिधी



चौसाळा येथील हनुमान मंदिर व महादेव मंदिर कळसाचे व नूतनीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे सदर मंदिरात बांधकामाला ग्रामस्थांनी आर्थिक मदत करावी असे आव्हान स्थानिक कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे

चौसाळा येथील वार्ड क्रमांक १ मधील भवानी नगर मध्ये हनुमान मंदिर व महादेव मंदिर जुने व पुरातन पारंपारिक असलेले हे दोन्ही मंदिरचे कळसाचे व नूतनीकरणाचे काम ग्रामस्थांच्या वतीने सुरू केले आहे सदर मंदिराला कुठलाही निधी उपलब्ध झाला नसल्याने आर्थिक बाबी कमी पडत आहे तरी ग्रामस्थांनी या दोन्ही बांधकामाला मदत करावी असे आवाहन स्थानिक कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.



**शिक्षण महर्षी भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथे गंगाई बाबाजी क्रीडा महोत्सव आज पासून तीन दिवसीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून सिने अभिनेते सुरेश विश्वकर्मा गीतकार संगीतकार व लेखक संजयजी नवगिरे हे राहीले होते त्यावेळी आपल्या मातीतील कलाकार लोक यांचा आपल्याला सार्थ अभिमान आहे .त्याच्या सोबत फोटो घेतला यावेळी . बाबाजी महाविद्यालय कडयाचे प्राचार्य डॉ हरिदास विधाते ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव बोडखे यशोदीप कंट्रक्शनचे बाळासाहेब भुकन,नाट्य कलाकार प्राध्यापक विनोद ढोबळे आदी**

## पान ६ वरून...

### पंकजाताई मुंडे यांच्या

कापडी पिशव्यांचा वापर करणे ही काळाची गरज आहे. पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे.''नवनाथ अण्णा शिरोळे यांनी नागरिकांना मार्गदर्शन करत, ''पर्यावरणाची काळजी घेत प्लास्टिकच्या पर्यायांचा स्वीकार करा. कापडी पिशव्यांचा वापर हा छोटा बदल असला तरी भविष्यासाठी मोठा आहे,'' असे सांगितले.उपस्थित नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करून प्लास्टिकच्या घातक परिणामांची माहिती देण्यात आली. या उपक्रमाला बीडकरांनी चांगला प्रतिसाद दिला.सेवा पंधरवडा या उपक्रमांतर्गत राबवलेल्या या कार्यक्रमामुळे गणेश लांडे यांच्या पुढाकाराने बीड शहरात पर्यावरण संवर्धनाचा नवा संदेश दिला गेला आहे. प्लास्टिक मुक्तीच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरले असून, पुढील काळात असे आणखी उपक्रम राबवले जातील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### अवैधरीत्या देशी, विदेशी,

पद्मीणबाई अंकुश गायकवाड रा. रमाईनगर माजलगांव,शेख अफताब शेख तुराब रा. तानाजीनगर माजलगावं,भगवान बापुराव मेंडके रा. कालीकानगर माजलगांव यांचे ताब्यातुन गावठी हातभट्टीची तयार दारु,गावठी हातभट्टी दारु तयार करण्यासाठी उपयोगात येणारे रसायण,देशी विदेशी दारु,दारु तयार करण्यासाठी उपयोगात येणारे साहीत्य असा एकुण १,३६,३४०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे माजलगाव शहर येथे दारुबंदी कायद्यान्वये वेगवेगळे सात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड,श्रीमती चेतना तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई,निरज राजगुरु उपविभागीय पोलीस अधिकारी माजलगाव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, सपोनि प्रल्हाद मुंढे, पोउपनि / केरबा माकणे,पोउपनि संदिप राठोड, पोउपनि तुळशिराम जगताप, सफौ/शत्रुघन शिंदे, पोहेकों गणेश तळेकर, किशोर जाधव, गौतम गायकवाड,गोविंद पाखरे,पोलीस अंमलदार महेश चव्हाण,संतराम थापडे,अमोल कदम,सुनिल गवळी,अंगद घोडके,पोकळे, महादेव कोकणे यांनी केली आहे.

### बळीराम गवतेंवर राष्ट्रवादीच्या

युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, पक्षाचे नेते आ.धनंजय मुंडे, आ.विजयसिंह पंडित, महिला आघाडीच्या नेत्या रूपालीताई चाकणकर, जिल्हाधक्ष राजेश्वर चव्हाण, माजी आमदार आजबे काका, माजी आमदार संजय दौंड, रमेशराव आडसकर साहेब,जयसिंग भैय्या सोळंके, योगेश भैय्या क्षीरसागर, राजकिशोर मोदी, अरुण भाई इनामदार, महेश अण्णा दाभाडे, प्रज्ञाताई खोसरे. यांच्या उपस्थितीत गवतेंवर युवक जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यत आली. यामुळे बळीराम गवते यांच्या पंखात पक्षाकडून बळ भरले जात आहे.यानंतर प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी बळीराम गवते यांच्या बळीराजा निवासस्थानी भेट दिली. यावेळी युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, आ.धनंजय मुंडे, जेष्ठ नेते अमरसिंह पंडित, आ.विजयसिंह पंडित, आ.विक्रम काळे, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकर, जिल्हाधक्ष राजेश्वर चव्हाण यांची उपस्थिती होती.

## खोलेश्वर विद्यालयात मंथन प्रज्ञाशोध परीक्षेतील विद्यार्थ्यांचा सत्कार




**दिंद्रुड । प्रतिनिधी**

मंथन प्रज्ञाशोध परीक्षेतील विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड येथे रविवारी सकाळी पार पडला या प्रसंगी शिवाज्ञा गुरुकुल माजलगावचे जिवन नखाते, अभिनव पब्लिक स्कूलचे संचालक गणेश गटकळ, लोकशक्ती विद्यालयाचे मुख्याध्यापक विकास निकाळजे, जि.प.गोळेगाव चे मुख्याध्यापक कैलास नागरगोजे, अण्णाभाऊ साठे शाळेच्या प्राचार्या सरिता फपाळ,यांची प्रमुख उपस्थिती होती.

इयत्ता पहिली ते आठवी मध्ये तालुका व जिल्ह्यातून प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचे ट्रॉफी, प्रमाणपत्र, व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमात ३७ सत्कारमूर्ती विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा सहभाग होता.मान्यवरांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यामध्ये स्पर्धा परीक्षेचे महत्त्व समजावून सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री स्वानंद फपाळ यांनी, प्रास्ताविक कृष्णा खांडेकर तर आभार पी.टी. रोडे यांनी मानले.या कार्यक्रमाचे आयोजन मंथन जिल्हा समन्वयक संजय रायते यांनी केले होते. सर्व सत्कारमूर्तींना उपस्थितांनी भावी शालेय जिवनासाठी शुभेच्छा देत मार्गदर्शन केले.

## दिल्ली येथे डॉ .श्रुती शेटे यांनी गुंतागुंतीची शस्त्रक्रिया केली यशस्वी



अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील मूळ राहिवासी डॉ . श्रुती शेटे ( निर्मळे ) यांनी आपल्या सहकारी डॉक्टरांसोबत एका रुग्णाची गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी करून रुग्णाला जीवदान दिले . रुग्णाच्या पोटातील दोन किलोचा मासांचा गोळा त्यांनी यशस्वी रित्या काढला .

या बाबत माहिती अशीः डॉ श्रुती विवेक शेटे ( पत्रकार शिवकुमार निर्मळे यांची कन्या ) या नवी दिल्ली येथील केंद्रसरकारच्या संजय गांधी मेमोरियल हॉस्पीटल मध्ये स्त्री रोग विषयावरील पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत . सातशे खाटांचे सुसज्ज हॉस्पीटल मध्ये रुग्णांची मोठी वर्दळ असते . महिला रुग्णांची तपासणी,प्रसूती , शस्त्रक्रिया या डॉक्टरांच्या नित्याचीच बाब बनली आहे. काही दिवसांपूर्वी एक ग्रामिण महिला रुग्ण पोटात दुखत असल्याचे सांगून उपचारासाठी रुग्णालयात दाखल झाली . उपचारा दरम्यान डॉक्टरांना रुग्णांच्या पोटात मासांचागोळा असल्याचे आढळले त्यांनी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला . डॉ श्रुती शेटे (निर्मळे) आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दोनतासाच्या अथक परिश्रमाने महिला रुग्णाची गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी करून पोटातून दोन किलो वजनाचा मासांचा गोळा बाहेर काढला . त्यामुळे रुग्णांचा जीव वाचला.डॉक्टरांच्या यशस्वी कामगिरी बद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे .

### पवार, मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त

शाहिद, त्वचारोग तज्ज्ञ डॉ.आशुतोष चाटे, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.प्रज्ञा किनगावकर, बालरोग तज्ज्ञ डॉ.अखिलेश अंजाण, डॉ.मोहम्मद तारेक, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.प्राची गिरविकार, डॉ.प्रणाली जाधव, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.विश्वनाथ वांढे, डॉ.प्रताप महाडिक, मेडिसीनचे डॉ.स्वप्नील बांडे, डॉ.हर्ष तिडके यांनी रूग्णसेवा दिली. भव्य शिबिर आयोजित केल्याबद्दल रूग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी डॉ.राजेश इंगोले व राजकिशोर पापा मोदी मित्र मंडळाचे आभार मानले. मोफत आरोग्य तपासणी शिबिराच्या यशस्वितेसाठी डॉ.अभ्युदय चौधरी, गोविंद गायकवाड, मयूर गायकवाड, शेख वाजेद, मनोज इंगोले, सचिन साळवे, अजित आव्हाड, धम्मराज सीताप, शेख बाबा, विशाल अंबाड, गौतम घनगाव, अजय रापतवार, तुषार मनोहर, समता मनोहर, अक्षय इंगोले, कृष्णा सोनपारखे, ज्योती घनगाव, शेख हमीद यांनी पुढाकार घेतला.

### अतिरिक्त मुख्य कार्यकारी

कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांची बदली अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद या पदावर झाली. त्यांनी त्यांनी दिनांक १५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील कार्यभार स्वीकारला. तर धाराशिव येथील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व्हि.पी. जाधव यांनी शुक्रवारी कार्यभार स्वीकारला. जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.

### राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या शहराध्यक्षपदी

पंडित, आ. विक्रम काळे, संजय दौड, राजकिशोर (पापा) मोदी, जयसिंह सोळंके आदी मान्यवर उपस्थित होते.माजी मंत्री धनंजयजी मुंडे व मा.आ. अमरसिंहजी पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली अमर नाईकवाडे यांनी आपल्या प्रभागासह बीड शहरात केलेली रस्ते-पाणी-स्वच्छता आणि आरोग्य सुविधा, विविध शिबिरे तसेच उपक्रम व उल्लेखनिय कामगिरी, शहरभर असलेला उत्तम जनसंवाद, विविध सामाजिक कामे, रात्रंदिवस नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी असलेली तळमळ, त्यांची पक्ष वाढीसाठी असलेली कार्यक्षमता पाहून आज त्यांची शहराध्यक्ष म्हणून नियुक्ती झालेली आहे.

## ऐतिहासिक कारंजा टॉवर जवळ रमेशराव गंगाधरे, झुंजार धांडे यांच्याकडून वृक्षारोपण

बीड । प्रतिनिधी

शनिवार दिनांक १९ जुलै २०२५ रोजी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि युवा नेते झुंजार धांडे यांनी ऐतिहासिक कारंजा टॉवर येथे वृक्षारोपण केले. यावेळी शेख वसीम, कारंजा टॉवर साठी सन २०१४ सालापासून संघर्षरत असलेले मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़, मधुकर धांडे, हाजी तालेब पटेल, हाजी सलीम, सुरेश शेटे, नवाज खान यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



काही महिन्यांपूर्वी पर्यंत ज्या ऐतिहासिक कारंजा टॉवरची दुर्दशा पाहून मोठे वैषम्य वाटत होते, तिथे आता या ऐतिहासिक वास्तुची दुर्दशा दूर करण्याकरिता नागरिकांतून अनेक हात पुढे सरसावू लागले आहेत. या ऐतिहासिक वास्तूचे रूप आकर्षक आणि मनमोहक करण्याकरिता नागरिकांकडून एकेक कार्य करण्यात येत आहे. यामुळे हळूहळू का होईना बीड शहराची ओळख असलेल्या या ऐतिहासिक वास्तूची दुर्दशेतून सुटका होऊ लागली आहे.

दक्षिण आणि पश्चिम बाजूचे अतिक्रमण काढले असले तरी अजूनही उत्तर बाजूला अतिक्रमण केलेले हातगाडे आणि लोखंडी सांगाड्यांचे अतिक्रमण हटलेले नाही. हे अतिक्रमण हटविण्यासाठी बीड नगर परिषद, पोलीस प्रशासन कधी कारवाई करेल का? याकडे नागरिक लक्ष देऊन आहेत. तत्पूर्वी सुजान नागरिक इमारतीच्या तिन्ही बाजूंनी वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावत आहेत. जसे ज्याला जमेल तसे जो तो आपल्या परीने स्वखर्चाने वृक्षदान करून येथे वृक्षारोपण करीत आहे. यामुळे ही ऐतिहासिक वास्तू हिरवाईने नटू लागली आहे.

## सोलार कंपनीला आ. प्रकाश सोळंकेसह नागरिकांचा विरोध

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील इंदिरानगर कुपा येथील गायरान ८ हेक्टर जमीन एम एस सी बी सोलार ॲग्रो प्रा. लि. यांना सातबारा पत्रकाला नोंद करून हस्तांतरित करण्यात आली आहे तरी या कंपनीच्या विरोधात स्थानिक नागरिक यांनी तक्रारी करून विरोध केलेला आहे तरी या मागणीच्या अनुषंगाने या भागाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी हि जिल्हाधिकारी यांना लेखी पत्र देऊन सदरील गट नंबर १०४ मधील आठ हेक्टर जमिनीचा हस्तांतरित केलेला फेरफार रद्द करण्याची मागणी केली आहे.



वडवणी तालुक्यातील इंदिरानगर कुप्पा येथील गट क्रमांक १०४ मध्ये आठ हेक्टर जमिनीवर एम एस सी बी सोलार ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचा प्रकल्प होत असून यासाठी या ठिकाणची गायरान आठ हेक्टर जमीन प्रकल्पासाठी वाटप करून हस्तांतरित करण्यात आलेली आहे तरी यामध्ये मौजे कुप्पा ता. वडवणी येथील गट नं. १०४ मध्ये इंदिरानगर वस्ती आहे. या ठिकाणी अनेक वर्षापासून ३०० घरांची वस्ती आहे. या ठिकाणी स्मशानभूमी, कब्रस्थान, पाण्याचे चार पाझर तलाव, जि.प.प्रा. शाळा, अंगणवाडी इमारत, व्यायाम शाळा, पाणी पुरवठा विहिर व पाण्याची टाकी इत्यादी बांधकामे झालेली आहे तसेच वन विभागा मार्फत मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केलेली आहे व या जमीनीतुनच रहदारीचा रस्ता आहे. येथील ८ हे. गायरान जमीन एमएसईबी सोलार ॲग्रो प्रा.लि. यांना जमीन वाटप करून हस्तांतरित करण्यात आलेली आहे. हस्तांतरण करण्या अगोदर इंदिरा नगर येथील बाळु सुखोबा सोनवणे व इतर नागरीकांनी इंदिरा नगर वस्ती कुप्पा ता. वडवणी यांनी मा. जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार वडवणी यांना दि. ११/०७/२०२४ व २४/०१/२०२५ रोजी आक्षेप अर्ज दिलेले आहेत परंतू याकडे दुर्लक्ष करून सदर वस्तीतील गायरान जमीन हस्तांतरित करण्यात आलेली आहे. सदर हस्तांतरित करण्यात आलेली जमीनीचा फेरफार रद्द करण्याची स्थानिक नागरीकांची मागणी आहे.तरी सदर मागणीच्या अनुषंगाने फेरफार रद्द करणे बाबत कार्यवाही करावी असे लेखी पत्र आमदार प्रकाश सोळंके यांनी जिल्हाधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी माजलगाव, तहसिलदार वडवणी यांना दिले आहे त्यामुळे हा सोलार प्रकल्प होणार की रद्द होणार कि रखडणार हे येणाऱ्या काळात कळेल.

cmyk

राज्य लोकतंत्र शेत-शिवार
सोमवार, दि. २१ जुलै २०२५ ४

# राज्यात ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्यांना मिळणार नवीन इमारती




**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्यांना नवीन इमारती मिळणार आहेत. तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून इमारत बांधकामासह दवाखान्याची दुरुस्ती, स्वच्छतागृह व उपकरण खरेदी यासाठी ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पर्यावरण व पशुसंवर्धन विभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या निर्णयामुळे राज्याच्या सात महसुली विभागातील ३४ जिल्ह्यांतील दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. नवीन इमारत बांधण्याकरिता २८७ कोटी ७६ लाख ४४ हजार, तर दुरुस्तीसाठी १२१ कोटी ११ लाख ८२ हजार, स्वच्छतागृहासाठी २५ कोटी १७ लाख २० हजार, विविध उपकरणे खरेदीसाठी २४ कोटी ३५ लाख ८८ हजार असा एकूण ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षांत जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ही सर्व कामे प्रस्तावित करण्यात येणार आहेत.

### “ या ठिकाणी मिळणार नवीन इमारती :

मुंबई विभाग - ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात १३, पुणे विभाग - पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यात १२५, नाशिक विभाग - नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर जिल्ह्यात ५५, छत्रपती संभाजीनगर विभाग : छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड जिल्ह्यात ५१, लातूर विभाग - लातूर, नांदेड, धाराशिव, हिंगोली जिल्ह्यात ३९, अमरावती विभाग - अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशीम, यवतमाळ जिल्ह्यात ३८. नागपूर विभाग - नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यात ३६ अशा एकूण ३२७ ठिकाणी नवीन इमारतीसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

# देशात ‘बीजी-७’ उपलब्धतेचा दावा खोटा-विजय जावंधिया



**कोइमतूर । वृत्तसंस्था**

**सरकारमधील मंत्र्यांनी त्यातही राज्याचे कृषिमंत्री असलेल्या व्यक्तींनी तंत्रज्ञानाच्या बाबतीत अपप्रचार न करता संपूर्ण माहिती घेऊन आणि शहनिशा करूनच वक्तव्य करावे,'' असा सल्ला शेती प्रश्नाचे ज्येष्ठ अभ्यासक विजय जावंधिया यांनी दिला आहे.**

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना लिहिलेल्या पत्रातून जावंधिया यांनी हा सल्ला दिला आहे. देशातील कापूस उत्पादकता वाढीच्या संदर्भात कोइमतूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान उपस्थित होते. या वेळी उपस्थिताना मार्गदर्शन करताना कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी महाराष्ट्रातील सुमारे ५० टक्के लागवड क्षेत्र हे अनधिकृत एचटीबीटी (हर्बिसाइड टॉलरंट बीटी) बियाण्याखाली आले असल्याचे जाहीरपणे सांगितले. या पार्श्वभूमीवर जावंधिया यांनी कोकाटे यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले, ‘‘शेतकऱ्यांना या बियाण्यांमुळे फायदा होत असल्यानेच ते चोरून या बियाण्यांचा वापर करून लागवड करीत असल्याची शक्यता आपल्या वक्तव्यातून वर्तविली गेली. त्याच वेळी आपण एचटीबीटीला मान्यता देण्याची विनंती केंद्रीय कृषिमंत्र्यांना केली. याला समर्थन म्हणून तुमच्याद्वारे अमेरिका, ब्राझील या प्रगत देशांमध्ये बीजी-७ पर्यंतचे तंत्रज्ञान वापरात असल्याबाबत सांगितले. परंतु अशा प्रकारचे कोणतेही तंत्रज्ञान कापूस उत्पादक देशांमध्ये अद्यापपर्यंत उपलब्ध नाही. तंत्रज्ञानविषयक चर्चा करताना त्याबाबतची पुरेशी माहिती घेऊनच बोलणे अपेक्षित असते. त्यातही मंत्रिमंडळातील आणि विशेषतः कृषिमंत्र्यांनी अशा बाबतीत अधिक सजग असण्याची गरज आहे. परंतु तज्ज्ञांकडून माहिती न घेता कोणाच्या तरी सांगण्यावरून किंवा ऐकीव माहितीच्या आधारे आपल्याद्वारे हे वक्तव्य करण्यात आले. शासकीय कार्यक्रमातून तरी अशा प्रकारचा अपप्रचार होऊ नये याकरिता खबरदारी घेतली जावी,'' असेही जावंधिया यांनी पत्रात नमूद केले आहे. काही शेतकरी संघटनांनी तर एचटीबीटी तंत्रज्ञान हे गुलाबी बोंड अळी प्रतीकारक असल्याचाही अपप्रचार चालविला आहे. त्याबाबतही शासनस्तरावरून जागृती करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# वाटाणा लागवड तंत्रज्ञान




**वर्षातील बाराही महिने वाटाणा म्हणजेच मटारला मागणी असते. वाटाणा पिकाची लागवड राज्यात बहुतांशी भागात खरीप व रब्बी या दोन्ही हंगामात मोठ्या प्रमाणात केली जाते. वाटाणा थंड हवामानात वाढणारे पीक आहे. कडाक्याची थंडी व धुके यामुळे पिकावर दुष्परिणाम होतो. पीक फुलोऱ्यात असताना उष्ण हवामान असल्यास शेंगात दाणे भरत नसल्याने प्रत कमी होते.**

हंगाम आणि विभागानुसार शिफारस केलेल्या जातीची लागवडीसाठी निवड करावी. हवामान बदलानुसार पीक पद्धतीचा वापर करावा. पीक फुलोऱ्यावर असताना व फळांची वाढ होत असताना नियमित पाणी पुरवठा आवश्यक असतो. या काळात पाण्याचा ताण पडल्यास फुलगळ, फळधारणा न होणे अशा प्रकारच्या समस्या निर्माण होऊ शकतात. हे टाळण्यासाठी या काळात पाण्याचे योग्य नियोजन करावे.

**हवामान :** जमिनीतील उपलब्ध ओलावा, पिकांची अवस्था व तेथील हवामान या मुद्द्याचा सखोल विचार करून शक्य असल्यास सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर करून पाणी व्यवस्थापन करावे. पिकाच्या मुख्य वाढीच्या अवस्थेमध्ये तापमानात वाढ झाल्यास बाष्पीभवनाचा दर वाढतो. तो कमी करण्यासाठी आणि जमिनीतील ओलावा टिकवण्यासाठी योग्य बाष्परोधकाची फवारणी करावी. त्याच प्रमाणे जमिनीवर आच्छादन केल्यास बाष्पीभवन कमी होऊन उत्पादन चांगले येते.

**लागवड ::** वाटाणा लागवडीसाठी मध्यम ते भारी, चांगल्या निचऱ्याची जमीन निवडावी. लागवडीपूर्वी प्रति हेक्टरी दहा टन शेणखत मिसळावे. लागवडीसाठी बोनव्हिला, अर्केल, फुले प्रिया या जातींची निवड करावी. लागवड ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात करावी. लागवड सरी-वरंबे किंवा सपाट वाफ्यामध्ये ३० १५ सें. मी. अंतराने करावी. टोकण पद्धतीने लागवड करताना ४० किलो बियाणे लागते. पेरणी पद्धतीसाठी ८० किलो बियाणे लागते. लागवडीपूर्वी मातीपरीक्षणानुसार १५ किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ६० किलो पालाश द्यावे. लागवडीनंतर एक महिन्याने दहा किलो नत्र खत प्रति हेक्टरी द्यावे.

# मिरचीवरील चुरडा मूरडा रोगाचे व्यवस्थापन

**मिरची पिकावर चुरडा मुरडा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. हा एक विषाणूजन्य रोग असुन त्यामुळे पानावर पिवळसर व हिरव्या रंगाचे डाग पडतात व पाने बारिक व वेडीवाकडी होतात अशा पानाचा गुच्छा तयार होऊन रोगट फांदीला झुपक्याचा आकार येतो. नविन फुटीचे छोटया पानात रूपांतर होऊन गुच्छा सारखे दिसतात व झाडाची वाढ पुर्णपणे खुंटते व उत्पादनात ४० ते ५० टक्क्या पर्यंत नुकसान होऊ शकते. या रोगाचा प्रसार रस शोषण करणाऱ्या किडीमुळे होतो म्हणुन मिर्ची पिकावर येणाऱ्या मावा, फुलकिडे, पांढरी माशी व कोळी या किडींबद्दल माहिती व व्यवस्थापनाचे उपाय करणे गरजेचे आहे.**



मावा : हि किड काळया किंवा पोपटी रंगाची असते. हया किडींची पिल्ले पंख विरहीत तसेच प्रौढ पंखासहित आढळतात. किड शेंडयावर पानावर खालच्या बाजूस राहून पानातील रस शोषूण घेते त्यामुळे झाडाची वाढ खुंटते व पाने निस्तेज दिसतात. तसेच हि किड आपल्या शरीरातून चिकट द्रव्य बाहेर सोडते त्यावर उष्ण व दमट हवामानात काळया रंगाची बुरशी वाढुन प्रकाश संश्लेषन कियेत अडथळा निर्माण होते, अन्न तयार करण्याच्या प्रक्रियेत बाधा निर्माण होऊन झाडाची वाढ खुंटते. या किडीची जिवन चक १० ते १२ दिवसात पुर्ण होते व एका वर्षात १२ ते १४ पिढया सहज पुर्ण होतात.

**पांढरी माशी :** पांढऱ्या माशीचे शरीर पिवळे व पंख पांढरे असतात, ती पानातून व फुलातून रस शोषन करून नुकसान पोहचविते. वाढलेले तापमान व आर्दता या किडीच्या वाढीस पोषक आहे. या किडीचे जिवनचक २५ते ३५ दिवसात पूर्ण होते तर वर्षाभरात ९ ते १० पिढया पूर्ण होतात.

**फुलकिडे :** हि किड अतिशय सुक्ष्म असुन तिचे शरीर लांबट आकारचे असते. किड पानावर तसेच फळावर पेशी खरबडून त्यातुन निघालेला रस शोषुन घेते त्यामुळे पाने वेडीवाकडी होतात तर फळावर खरबडल्यासारखे चट्टे दिसतात झाडाची वाढ थांबुन पाने व कळयाची गळ होते.

**कोळी :** हि अष्टपाद वर्गातील किड असुन आकाराने अतिशय सुक्ष्म असते. पिवळसर रंगाचे कोळी पानावर राहून रस शोषुन घेतात. प्रादुर्भाव ग्रस्त झाडाची पाने खालच्या दिशेने वाकडी होतात. जास्त प्रादुर्भाव असल्यास झाडाची वाढ खुंटते तसेच फुले व कळया गळण्याचे प्रमाण वाढते.

**व्यवस्थापन :** पेरणीपूर्वी गादीवाफ्याला पाणी देऊन ०.४५ मिमि जाड प्लास्टिकच्या शिटने तिन आठवडे झाकुन ठेवावे. त्यामुळे उष्णतेने मातीचे निरजंतूकरण होते व मातीमधील हानीकारक बुरशी तसेच किडीची नायनाट होतो. पांढऱ्या माशीच्या व्यवस्थानासाठी पिवळया रंगाचे तर फुलकिडयासाठी निळया रंगाचे चिकट सापळे लावावेत. शेताच्या चहूबाजुनी मका, चवळी व झेंडू च्या तिन ओळी लावाव्या या पिकांवर क्रायसोपा, लेडी बर्ड बिटल इत्यादी परभक्षी किटकाची वाढ होऊन रस शोषण करणाऱ्या किडींच्या नियंत्रणास मदत होते. सुवातीच्या अवस्थेत चुरडा मुरडा रोगग्रस्त झाड आढळल्यास त्वरीत उपटून नष्ट करावे जेणेकरून पुढील प्रादुर्भावास अटकाव करता येईल. नत्र युक्त खताचा वापर शिफारशीत मात्रेतच करावा. मिरची पिकाचे वेळोवेळी सर्वेक्षण करून रस शोषण करणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच. घरी तयार केलेल्या ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. रस शोषण करणाऱ्या किडीच्या व्यवस्थानासाठी इमीडाक्लोप्रीड ७० टक्के डब्ल्युएस १० ग्रॅम किंवा थायोमेक्थाझाम ३० एफएस ७ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणे बिज प्रक्रिया करावी. रासायनिक किटकनाशकाची फवारणी करावयाची असल्यास शिफारशीत किटकनाशके. जसे डायमेथोएट ३० ईसी १४ मिली किंवा फिप्रोनील ५ एससी २० मिली किंवा फेनप्रोथिऑन ३० टक्के ३.५ मिली किंवा इथिऑन ५० ईसी ४० मिली यापैकी कोणतेही एक किटकनाशक प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. एकचएक किटकनाशक पुन्हा पुन्हा न वापरता आलटून पालटून वापरावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

३५६ : ३५६ इ.स. पूर्व : जगातील सात आश्चर्यांपैकी एक एफिसस आर्टेमिसचे मंदिर नष्ट झाले.
१८३१ : बेल्जिअमचा पहिला राजा लिओपॉल्ड याचा शपथविधी झाला.
१८७९ : क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांना इंग्रजांनी अटक केली
१८८३ : कोलकाता येथे पहिल्या नाट्यगृहाची स्थापना
१८८४ : लॉर्डस मैदानात पहिले क्रिकेट टेस्ट मॅच: सेंट जॉन्सवूड यांनी लंडनमध्ये लॉर्डस मैदानाचा शोध लावला. त्यामुळेच या मैदानाचे नाव लॉर्डस ठेवण्यात आले. या लॉर्डस मैदानावर पहिला कसोटी सामना खेळवण्यात आला.
१८८८ : स्कॉटिश शोधकर्ता आणि पशुवैद्यकीय सर्जन जॉन बॉयड डनलॉप यांनी रबराचे टायर आणि ट्यूब तयार करून परिवहन करण्यास गती निर्माण करून दिली.
१९४४ : २० जुलै १९४४ रोजी ॲडॉल्फ हिटलरची हत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या क्लाऊस व्हॉन स्टाऊफेनबर्गला फाशी देण्यात आले.
१९५४ : पहिले इंडोचिनी युद्ध जिनिव्हा परिषदेने व्हिओतनाम देशाचे उत्तर व्हिएतनाम आणि दक्षिण व्हिएतनाममध्ये विभाजन केले. २१ जुलै १९५४ रोजी जिनिव्हा येथे झालेल्या एका परिषदेत इंडोचीनची फाळणी करण्याचे ठरले.
१९६० : सिरीमाओ बंदरनायके या श्रीलंकेच्या ६ व्या पंतप्रधान बनल्या. त्या जगातील पहिल्या महिला पंतप्रधान होत.
१९६२ : भारत चीन सीमावाद भारत-चीन युद्ध
१९६३ : कशी विद्यापीठाला विश्वविद्यालयाचा दर्जा मिळाला.
१९७६ : आयर्लंडमधील ब्रिटिश राजदूताची हत्या
१९८३ : अंटार्क्टिकावरील व्होस्टॉक येथे उणे ८९.२ सेल्सिअस या पृथ्वीवरील आत्तापर्यंतच्या सर्वात नीचांकी तापमानाची नोंद केली गेली.
२००२ : जगभर दूरसंचार सेवा पुरवणार्या ’वर्ल्ड कॉम’ या अमेरिकन कंपनीने दिवाळखोरी घोषित केली.
२००७ : प्रतिभा पाटील भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती बनल्या: २१ जुलै २००७ रोजी प्रतिभा पाटील यांनी राष्ट्रपतीपदाची जबाबदारी स्वीकारली. भारताच्या राष्ट्रपतीपदावर नेमल्या गेलेल्या त्या पहिल्या महिला होत्या.
२०१८ : भारतामधील सॅनिटरी उत्पादनावरील टॅक्स सरकारने होत असलेल्या विरोधानंतर मागे घेतला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१६ : ब्रिटीश वर्तमानपत्र समूह राईटर चे संस्थापक ज्युलियस राईटर यांचा जन्मदिन.
१८५३ : शंकर बाळकृष्ण दीक्षित ज्योतिर्विद, पाश्चिमात्य व पौर्वात्य जोतिषगणिताचे अभ्यासक, ग्रंथलेखक (मृत्यू: २७ एप्रिल १८९८)
१८९९ : अर्नेस्ट हेमिंग्वे नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन लेखक (मृत्यू: २ जुलै १९६१)
१९१० : वि. स. पागे स्वातंत्र्यसैनिक, गांधीवादी कार्यकर्ते, संत वाङ्मयाचे अभ्यासक, महाराष्ट्र विधानसभेचे सभापती, रोजगार हमी योजनेचे जनक (मृत्यू: १६ मार्च १९९०)
१९११ : भारतीय लेखक, कवी आणि विद्वान उमाशंकर जोशी यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९८८)
१९२० : आनंद बक्षी गीतकार (मृत्यू: ३० मार्च २००२)
१९३० : डॉ. रा. चिं. ढेरे भारतीय संस्कृतीचे अभ्यासक संशोधक
१९३४ : चंदू बोर्डे भारतीय क्रिकेटपटू आणि निवड समितीचे अध्यक्ष पद्म भूषण, पद्मश्री, अर्जुना पुरस्कार
१९४५ : दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट खेळाडू बॅरी रिचर्ड्स यांचा जन्म.
१९४७ : चेतन चौहान सलामीचे फलंदाज आणि राज्यसभा सदस्य
१९५१ : अमेरिकन हास्य अभिनेते रॉबिन विलियम्स यांचा जन्मदिन.
१९६० : पंजाबी गायक अमरसिंग चमकीला यांचा जन्म. (मृत्यू: ८ मार्च १९८८)
१९६८ : आदित्य श्रीवास्तव भारतीय अभिनेते

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन


१९०६ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रथम अध्यक्ष व राजकारणी उमेशचंद्र बनर्जी यांचे निधन.
१९७२ : जिग्मे दोरजी वांगचुक भूतानचे राजे (जन्म: २ मे १९२९)
१९९४ : डॉ. र. वि. हेरवाडकर इतिहास संशोधक, वाङ्मय समीक्षक, मराठी बखर वाङ्मयाचे व्यासंगी अभ्यासक (जन्म:)
१९९५ : सज्जाद हुसेन संगीतकार व मेंडोलीनवादक (जन्म: १५ जून १९१७ सीतामहू, मंदसौर, मध्य प्रदेश)
१९९७ : राजा राजवाडे साहित्यिक (जन्म: १ जानेवारी १९३६). राजा राजवाडे यांनी अनेक कांदबऱ्या, कथासंग्रह, कविता संग्रह, ललित गद्य लिहिले आहेत. तसेच त्यांनी सलग ३५ वर्षे १८ नियतकालिकांतून स्तंभलेखन केलं आहे.
१९९८ : अमेरिकन अंतराळवीर ॲलन शेपर्ड यांचे निधन.
२००१ : विझुपुरम चिन्नया तथा शिवाजी गणेशन दाक्षिणात्य अभिनेते (जन्म: १ आक्टोबर १९२८)
२००२ : मराठी चित्रकार गोपाळराव बळवंतराव कांबळे यांचे निधन.
२००९ : गंगूबाई हनगळ किराणा घराण्याच्या शास्त्रीय गायिका (जन्म: ५ मार्च १९१३)
२०१३ : भारतीय मार्शल आर्टिस्ट लूरेम्बॅम ब्रजेशोतोरी देवी यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १९८१)

# गोठ्यातील जनावरांच्या नोंदी ठेवल्यास होतो मोठा फायदा

**शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन व्यवसाय भारतामध्ये गेल्या कित्येक वर्षापासून शेतकरी करतात. या व्यवसायाच्या माध्यमातून दूध उत्पादन हा शेतकऱ्यांचा प्रमुख आर्थिक आधार असतो. परंतु आता या व्यवसायामध्ये देखील मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागल्याने एका व्यावसायिक स्वरूपामध्ये पशुपालन व्यवसाय आता केला जाऊ लागला आहे. या व्यवसायाच्या माध्यमातून दूध उत्पादन तसेच दुग्धजन्य पदार्थ निर्मिती सारखे उद्योग प्रगतीच्या मार्गावर असून अनेक शेतकऱ्यांसाठी हा व्यवसाय एक आर्थिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरला आहे. व्यावसायिक कोनातून जर बघितले तर यशस्वी होण्यासाठी या व्यवसायात देखील आपल्याला प्रत्येक गोष्टींचे व्यवस्थापन आणि काटेकोरपणे काळजी घेणे तितकेच गरजेचे असते.**

**जन्म ते पुर्ण वाढ याकडे लक्ष द्या :**

पशुपालन व्यवसाय सुरू केला व त्या माध्यमातून आपण दुधाचे उत्पादन घेत आहोत इथपर्यंतच हा व्यवसाय महत्त्वाचा नसून तुम्हाला या सगळ्या टप्प्यामध्ये दुभत्या जनावरांची काळजी घेणे तितकेच गरजेचे असते. जेणेकरून तुम्हाला या व्यवसायात आर्थिक टप्प्यावर कुठलेही नुकसान होणार नाही व तुमचा व्यवसाय हा यशस्वी होईल. याकरिता काही छोट्या परंतु महत्त्वाच्या गोष्टी तुम्ही करणे खूप गरजेचे आहे. या सगळ्यांमध्ये जर आपण बघितले तर वासराचा जन्म झाल्यापासून तर ते पुढे गाभण होईपर्यंतचा जो काही मधला टप्पा आहे तो खूप महत्त्वाचा असून या टप्प्यांमध्येच काही महत्त्वाच्या मुद्द्यांकडे तुम्ही लक्ष दिले तर तुमचा व्यवसाय कधीही नुकसानीचा ठरणार नाही.



**महत्त्वाच्या नोंदी :** यामध्ये सगळ्यात अगोदर जेव्हा वासराचा जन्म होतो तेव्हापासून तुम्ही प्रत्येक टप्प्यावर लक्ष देणे गरजेचे आहे व यामध्ये तुम्ही वासराच्या जन्मवेळची नोंद जेव्हा जन्म झाला तेव्हाचे वजनाची नोंद करणे खूप गरजेचे आहे. कारण संबंधित वासराच्या वाढीचा आढावा किंवा अंदाज घेण्यासाठी तुम्हाला ही माहिती उपयुक्त असते. तसेच दुसरे महत्त्वाचे म्हणजे वासरांचे संगोपन जर व्यवस्थित पद्धतीने झाले तर ती कालवड १२ ते १४ महिन्यात माजावर येऊ शकते व या कालावधीत जर कालवडीचे वजन योग्य असेल तर पुढील रेतन देखील यशस्वी होण्याची शक्यता असते.

**नोंदीमुळे असे होतात फायदे :** या सगळ्यामुळे दीर्घकाळ तुमचा संगोपन खर्च होत असेल तर त्यामध्ये बचत होऊ शकते. तिसरे महत्त्वाचे म्हणजे पहिल्या व पुढील रेतनाच्या नोंदीमुळे गाभण कालावधीतील पोषण व निगा नीट राखता येते. महत्वाचे म्हणजे गाय किंवा म्हैस केव्हा व्याली याची नोंद तुम्हाला खूप महत्त्वाचे ठरते व पुढे विक्रीवेळी अशा नोंदणीचा फायदा होतो व या नोंदणीमुळे दोन वेतातील अंतर देखील समजण्यास मदत होऊन त्या दृष्टीने व्यवस्थापन करता येते. तसेच दररोज व एकूण वेतातील सरासरी दूध उत्पादनाची माहिती ठेवणे देखील गरजेचे आहे. कारण पुढील वेतातील अपेक्षित दूध वाढ समजून घेण्यासाठी तुम्हाला ही माहिती फायद्याची ठरते. तसेच संबंधित जनावराची दूध उत्पादन क्षमता तसेच त्यांचा वंश, आरोग्य इत्यादींच्या नोंदी तुम्हाला भविष्यामध्ये गुणवत्तेच्या बाबतीत काय करावे याची दिशा ठरवण्यास मदत करते. अशाप्रकारे तुम्ही जर वरील सर्व माहिती अचूक पद्धतीने नोंद करून ठेवली तर ही एक प्रकारे जन्म कुंडली तयार होते व संबंधित जनावरांच्या भविष्यकालीन आरोग्यदायी व इतर उपाययोजनांसाठी फायदेशीर ठरते व दूध उत्पादक गायींची परिपूर्ण माहिती पत्रिका आपल्याला उपलब्ध होते.

# भाजपा सर्व घटकांना न्याय देणारा पक्ष - जिल्हाध्यक्ष देशमुख

## केज मतदारसंघात भाजपाने विकास प्रक्रिया गतिमान केली -ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**भारतीय जनता पार्टी अंबाजोगाई शहरची कार्यकारिणी शुक्रवार, दिनांक १८ जुलै रोजी जाहीर करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, जेष्ठ नेते नंदकिशोर (काकाजी) मुंदडा यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. अंबाजोगाई शहरची जम्बो कार्यकारिणीत ६३ जणांचा आणि मोर्चा व आघाडीचे मंडळ अध्यक्ष म्हणून ५ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. अशी माहिती भारतीय जनता पार्टी अंबाजोगाई शहर अध्यक्ष संजय गंभीरे यांनी दिली आहे.**

भारतीय जनता पक्ष अंबाजोगाई शहर अध्यक्ष संजय गंभीरे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सन्माननीय देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण, पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, केज मतदारसंघाच्या कार्यसम्राट आमदार नमिताताई मुंदडा, राज्य परिषद सदस्य अक्षयजी मुंदडा, जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, जेष्ठ नेते नंदकिशोर (काकाजी) मुंदडा या सर्वांच्या सुचनेनुसार भारतीय जनता पार्टी अंबाजोगाई शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. शुक्रवारी आमदार नमिताताई मुंदडा यांच्या संपर्क कार्यालयात जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, जेष्ठ नेते नंदकिशोर (काकाजी) मुंदडा यांच्या यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी उपस्थित पदाधिकारी यांच्याशी संवाद साधताना जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी भाजपा समाजातील सर्व समाज घटकांना न्याय देणारा पक्ष आहे. भाजपचे माध्यमातून देश प्रगतीपथावर जात आहे. आपण ही आपल्याला मिळालेल्या पदाचा उपयोग लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी करावा, पक्ष संघटना बळकट करावी असे आवाहन केले. तर जेष्ठ नेते नंदकिशोर (काकाजी) मुंदडा यांनी सांगितले की, केज मतदारसंघात भाजपाने विकास प्रक्रिया गतिमान केली आहे. अनेक कामे केली आहेत. अनेक कामे होत आहेत, प्रगतीपथावर आहेत व अनेक नव्या कामांना आमदार नमिताताई व अक्षय मुंदडा यांनी मंजुरी व निधी उपलब्ध करून दिला आहे.केज मतदारसंघाचा सर्वांगिण विकास करणे हेच आपले सर्वांचे



ध्येय आहे. याकामी आपण नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन भाजपा पक्षाला अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचवा असे आवाहन श्री मुंदडा यांनी केले. यावेळी सुत्रसंचालन व प्रास्ताविक शहराध्यक्ष संजय गंभीरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार नवनिर्वाचित ओबीसी मोर्चा अध्यक्ष शैलेश स्वामी यांनी मानले. याप्रसंगी अंबाजोगाई शहरची जम्बो कार्यकारिणीत ६३ जणांचा आणि मोर्चा व आघाडीचे मंडळ अध्यक्ष म्हणून ५ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्वप्रथम या कार्यकारिणी मध्ये निवड झालेल्या सर्व सन्माननीय पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी मनःपुर्वक हार्दिक अभिनंदन केले. आणि पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या. अंबाजोगाई शहराच्या जम्बो कार्यकारिणीत उपाध्यक्ष म्हणून प्रशांत आदनाक, डॉ.सुधीर धर्मपात्रे, विनोद पोखरकर, कल्याण काळे, उषा यादव, दीक्षा अतुल कसबे, सरचिटणीस म्हणून डॉ.निशिकांत पाचेगावकर आणि अजित सांगळे, चिटणीस म्हणून राणा चव्हाण, विष्णू पांचाळ, गोविंद शिंपले, राजकुमार गायके, बालाजी शेरेकर, अल्का संतोष, कोषाध्यक्ष सत्यप्रेम इंगळे, तर कार्यकारिणी सदस्य म्हणून अजय राठोड, नाना गायकवाड, प्रताप देवकर, अक्षय भुमकर, बाळू भराडीया, रमेश जाधव, मोहित कराड, माऊली वैद्य, गौतम बडे, सचिन केंद्रे, सचिन वाघमारे, ॲड.अरविंद मोटेगावकर, शैलजा पंडित जोगदंड, मीरा दीपक मस्के, सविता महादू मस्के, उज्वला बाला पाथरकर, रतन नेमीचंद संघई, सपना निखिल डहाळे, पूजा अनिल धोत्रे, निकिता धम्मदीप सरवदे, जयश्री सुरेश कराड, रेहाना मतलूब शेख, सारिका निकेश जगदाळे, सुप्रिया राहुल कापसे, हिंदवी ओमकार पोतदार, आर्शिया साजेद मोहम्मद, दीप्ती दिग्विजय लोमटे, चंद्रकांत बनसोडे, अविनाश साठे, महादेव गव्हाणे, प्रसाद कोठावळे, मोबीन पठाण, प्रविण भाकरे, अक्षय लोमटे, अतिकांत कांबळे, संजय गायसमुद्रे, मुस्तफा रेगीवाले, मतीन बागवान, दानिश शेख, ताबीज सिद्दीकी, शेख इर्शाद, सचिन जोगदंड, शाकेर बागवान, खलील बागवान, ताहेर शेख, सुजात शेख आणि अक्षय शिंदे यांचा समावेश आहे. तर मोर्चा व आघाडी मंडळ अध्यक्ष म्हणून रजिया अहमद पप्पुवाले (महिला मोर्चा), महेश अंबाड (युवा मोर्चा), शेख रौफ (अल्पसंख्यांक मोर्चा), संतोष शिनगारे (अनुसूचित जाती मोर्चा) आणि शैलेश स्वामी (ओबीसी मोर्चा) यांचा समावेश आहे. अशी माहिती भाजपाचे अंबाजोगाई शहराध्यक्ष संजय शहाजीराव गंभीरे यांनी दिली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सन्माननीय देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण, पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, केज मतदारसंघाच्या कार्यसम्राट आमदार नमिताताई मुंदडा, राज्य परिषद सदस्य अक्षयजी मुंदडा, जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख, जेष्ठ नेते नंदकिशोर (काकाजी) मुंदडा यांच्या सुचनेनुसार भारतीय जनता पार्टी अंबाजोगाई शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. अंबाजोगाई शहरची जम्बो कार्यकारिणीत ६३ जणांचा आणि मोर्चा व आघाडीचे मंडळ अध्यक्ष म्हणून ५ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही कार्यकारिणी सर्वसमावेशक आहे. विविध समाज घटकांना सोबत घेऊन भाजपाने त्यांना न्याय दिला आहे. पुढील काळात केज मतदारसंघाच्या कार्यसम्राट आमदार नमिताताई मुंदडा, राज्य परिषद सदस्य अक्षयजी मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली आणि जेष्ठ नेते नंदकिशोर (काकाजी) मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व भाजपा प्रेमी नागरिकांना सोबत घेऊन अंबाजोगाई शहर भाजपामय करण्याचा प्रयत्न केला जाईल.

# रोटरॅक्ट क्लबने निर्माण केलेल्या पोलिस चौकीचे लोकार्पण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

रोटरॅक्ट क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने बसस्थानक परिसरात गर्दीवर नियंत्रण ठेवणाऱ्या पोलिस बांधवांसाठी निवारा म्हणून पोलिस चौकीची निर्मिती करण्यात आली. या चौकीचा लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या उपस्थित झाला.



या लोकार्पण समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, नायब तहसीलदार स्मिता बाहेती,नगर परिषदेच्या मुख्याधिकारी प्रियंका टोंगे, रोटरीच्या अध्यक्षा प्रा रोहिणी पाठक सचिव मंजुषा जोशी,सामाजिक कार्यकर्ते आनंद कर्णावट, इनरव्हीलच्या अध्यक्षा संगीता नावंदर, रोटरॅक्टचे अध्यक्ष जतिन कर्णावट,सचिव अभिजीत पारीख, नूतन अध्यक्ष विशाखा बजाज, नूतन सचिव मयुर परदेशी यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना चेतना तिडके म्हणाल्या की रोटरॅक्ट क्लबच्या युवकांनी नवनिर्मितीच्या माध्यमातून ही चौकी निर्माण करून पोलिस यंत्रणेला मोठी मदत केली आहे. समाजातील उपेक्षितांना न्याय देण्यासाठी युवकांनी पुढे येण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी जतिन कर्णावट यांनी रोटरॅक्ट क्लब सामाजिक कार्यासाठी पुढाकार घेत असल्याचे सांगितले. बसस्थानक परिसरात सेवा देणाऱ्या बांधवांना निवारा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व सोयींनी ही चौकी निर्माण करण्यात आल्याचे सांगितले.यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत चौकीचा लोकार्पण सोहळा पार पडला. या कार्यक्रमाचे संचालन शिवानंद मोरे यांनी केले . तर उपस्थितांचे आभार स्नेहल नागरगोजे यांनी मानले. यावेळी रोटरॅक्ट सदस्य सतीश चौधरी, दिनेश सोमवंशी, संदीप जाधव,रमण बजाज, आशिष चौसाळकर, सर्वेश बजाज, रमण भन्साळी, जयदेव पारिख, समीर फड, सम्यक कर्नावट, सुधीर गिल्डा यांची उपस्थिती होती.

# जवळगाव शिवारातून एकाच रात्रीत सहा पाणबुडी मोटारी चोरीला

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**तालुक्यातील जवळगाव शिवारात विहिरीतील पाणबुडी मोटारी चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत चालल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. एकाच रात्रीत जवळगाव शिवारातील तब्बल सहा शेतकऱ्यांच्या विहिरीतील पाणबुडी मोटारी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अविनाश मधुकर साळुंके (वय २५) रा. जवळगाव यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १६ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास पावसामुळे ते वडिलांसोबत गावाकडे परतले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता शेताची पाहणी करण्यासाठी गेले असता विहिरीतील पाणबुडी मोटार चोरीला गेल्याचे लक्षात आले.**

त्यानंतर त्यांनी शेजारील आपल्या चुलत भावांच्या व शेजारील शेतकऱ्यांच्या विहिरींची पाहणी केली असता दिपक गोकुळ साळुंके, प्रकाश गोकुळ साळुंके, बालासाहेब यशवंत साळुंके, प्रभाकर किसन बनसोडे, राजपाल बापूसाहेब शिंदे यांच्या विहिरीतील मोटारीसुद्धा चोरीस गेलेल्या आढळल्या. या सर्व पाणबुडी मोटारी व वायर मिळून एकूण ६९ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले. या चोरीचा कालावधी १६ जुलै रोजी सायंकाळी ५.३० ते १७ जुलै रोजी सकाळी ९ वाजेच्या दरम्यानचा असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. सदर फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांवर बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ग्रामीण भागात अशा प्रकारच्या चोरीच्या घटना वारंवार घडत असून शेतकऱ्यांना सतर्क राहण्याची गरज आहे. पोलीसांनी या चोरीचा तपास तातडीने करावा आणि चोरट्यांना अटक करावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

# अत्याचार सहन न करता त्याला जागेवरच वाचा फोडा -न्या.खोमणे

आष्टी । प्रतिनिधी

१८ वर्षे वया खालील बालकांवर अन्याय किंवा अत्याचार झाल्यास त्यासाठी पोक्सो कायदा अंमलात आणला आहे.यामुळे अन्यायग्रस्त मुलीला वाळीत टाकण्यात येणार नाही,तिचे नाव कुठेही वृत्तपत्रात किंवा समाज माध्यमातून जाहीर करता येत नाही. पोलिस देखील सध्या गणवेशात भेटीला येतात.या कायद्यात बालकाला दडपण येऊ नये अशी व्यवस्था असते.त्यामुळे मुलींनी न घाबरता पुढे येऊन आई-वडील,शिक्षक यांना सांगून,आपल्यावर झालेल्या अत्याचारला वाचा फोडावी असे आवाहन आष्टी दिवाणी न्यायालय क स्तरचे न्यायाधीश के.के.खोमणे यांनी केले.




आष्टी शहरातील जिल्हा परिषद कन्या प्रशाळा,तालुका विधी सेवा समिती व दिवाणी न्यायालय 'क' स्तर आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार (दि.१९) आयोजित,'बेटी बचाव,शिक्षण हक्क व पोस्को कायदे विषयक मार्गदर्शन' संपन्न झाले यावेळी ते बोलत होते.यावेळी सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती पी.जी. इनामदार, सह दिवाणी न्यायाधीश एम.आर.बडाख,शाळेचे मुख्याध्यापक ए.ए.खताळ,वकील संघांचे अध्यक्ष अँड.अजय जेवे यांच्यासह आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.यावेळी न्यायाधीश खोमणे यांनी मुलींशी संवाद साधत त्यांच्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली.सूत्रसंचलन अँड.वाय.टी. सय्यद,अँड.ए.एस.निंबाळकर केले,तर आभार अजय जेवे यांनी मानले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थिनी उपस्थित होते.आष्टी-शहरातील कन्या शाळेतील कायदेविषयक कार्यक्रमात आष्टीचे दिवाणी न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग के.के.खोमणे यांच्यासह पदाधिकारी दिसत आहेत.

# अभय योजनेचा लाभ घेऊन थकीत मालमत्ता करावरील दंडात सुट मिळवा- जयश्री विधाते

बीड । प्रतिनिधी



काही कारणास्तव मालमत्ता धारकांने नगर पालीकेला वेळेवर मालमत्ता कर भरला नसल्यास त्या थकीत रक्कमेवर नगर पालीका दंड आकारत असते. तेंव्हा थकीत मालमत्ता करावरील दंडाच्या रक्कमेत ५०% किंवा त्या पेक्षा जास्त सुट देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे याचा लाभ घेण्याचे आवाहन माजी नगरसेविका जयश्री विधाते यांनी केले आहे.

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५० नुसार (१) (अ) नुसार बिलाच्या न भरलेल्या रक्कमेवर विशिष्ट % दरमहा दंड आकारला जातो. यामुळे कर भरणा रक्कमेत वाढ होते. परिणामी करवसुली चा दर मंदावतो. तेंव्हा कर भरण्यासाठी मालमत्ताधारकांना प्रोत्साहन मिळावे म्हणून शासनाने अभय योजना (थकीत मालमत्ता करावरील दंडाच्या रक्कमेत ५०% किंवा जास्त सुट देण्याचा निर्णय) लागु केली असुन दि. १९ मे २५ पुर्वीच्या थकीत कराच्या दंडातच सुट दिली जाईल. यासाठी नगर पालिकेत विहीत नमुन्यात अर्ज दाखल करावा लागेल. तो अर्ज नगर पालीकेतुन उपलब्ध करून दिला जाईल. अर्जा सोबतच मालमत्ता कराच्या मागणीच्या बिलाची छायांकित प्रत, आधार कार्डची छायांकित प्रत, संपुर्ण कर कराची रक्कम भरल्याच्या पावतीची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी दि ८ ऑगस्ट २५ पर्यंत अर्ज दाखल करावा, असे आवाहन जयश्री विधाते यांनी केले आहे.


# पालवण रस्त्यावरील रेल्वे पुल पाडण्याचे काम सुरू

## आश्वासन देवूनही दोषींवर रेल्वे सुरक्षा आयुक्तांची कारवाई करण्यास टाळाटाळ - डॉ. ढवळे

बीड । प्रतिनिधी

अहिल्यानगर- बीड रेल्वे मार्गावरील चऱ्हाटा रोडवरील पालवण फाटा येथे पावणे तीन कोटी रुपये खर्चून उभारलेला रेल्वेपुल लोहमार्ग व पुलाची दिशा यांचा अंदाज चुकल्याने निरुपयोगी ठरला आहे. आता तो पाडण्याचे काम जोमाने सुरू आहे. या प्रक्रियेत जनतेच्या करातून शासनाकडे जमा झालेल्या निधीचा प्रचंड अपव्यय होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणात सखोल चौकशी करून संबंधित अभियंता, ठेकेदार कंपनी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून शासन तिजोरीत नुकसानभरपाई जमा करावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस, सुदाम तांदळे, रामनाथ खोड, शिवशर्मा शेलार , शेख मुस्ताक, शेख मुबीन,अशोक येडे,रामधन जमाले यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यावेळी रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांनी ''लवकरच कारवाई होईल'' असे आश्वासन दिले होते.



### खा. बजरंग सोनावणे व आ. संदीप क्षीरसागर गप्प

त्यावेळी खा.बजरंग सोनावणे व आ.संदीप क्षीरसागर यांनी पालवण फाटा पुलाची प्रत्यक्ष पाहणी करून आंदोलनकर्त्यांची भेट घेतली होती. त्यांनी रेल्वे सुरक्षा आयुक्तांशी चर्चा करून कारवाईसाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आजवर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने, ''या विषयावर लोकप्रतिनिधींनी मुग गिळून गप्पच राहणे निंदनीय आहे,'' अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

मात्र साडेपाच महिने उलटूनही कोणतीही कारवाई न झाल्याने, आता पुल पाडण्याचे काम सुरू असून, सामाजिक कार्यकर्त्यांनी पुन्हा आंदोलनाचा इशारा रेल्वे प्रशासनाला दिला आहे.

# हातभट्टीवर पोलीसांच्या ७० ठिकाणी धाडी



जालना (प्रतिनिधी)

१९ जुलै रोजी सकाळी ६ वाजता पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक, अनंत कुलकणी, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग , उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, अंबड, निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, सर्व पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी व इतर पोलीस अधिकारी (४०), पोलीस अंमलदार (१७३) यांनी जालना जिल्ह्यात हातभट्टीची दारु तयार करणाऱ्या विविध पोलीस ठाणे हद्दीतील वेगवेगळ्या ठिकाणांवर एकाचवेळी ७० ठिकाणी छापा कारवाई केली. यामध्ये एकुण ४९६९ लिटर गावठी हातभट्टीची दारु व ३३६२० लिटर दारु तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल व रसायन, सडवा असा एकुण ४०,७०,८५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन जागेवर नष्ट केला. या कारवाईत ७० इसमाविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याप्रमाणे गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

# नुसते मेळावेच काय घेता, बीडचा विकास कधी करणार -जायभाये

## मेळाव्यांच्या नौटंकी पेक्षा बीडकरांच्या मूलभूत सुविधांचे व विकासाचे प्रश्न ज्वलंत नाहीत का - बीड शहर बचाव मंचचा संतप्त सवाल

बीड । प्रतिनिधी

तुमच्या कार्यकर्त्यांचे रुसवे-फुगवे काढणे हेच इतके महत्त्वाचे आहे का? तुम्हा सत्ताधाऱ्यांना तुमच्या कार्यकर्त्यांचे रुसवे, फुगवे दिसतात पण बीडकरांच्या ज्वलंत अडचणी, डोळ्यातले अश्रू का दिसत नाहीत? कार्यकर्त्यांची दशा- दिशा पाहण्यासाठी सत्ताधारी नेत्यांना बीड शहराची दुर्दशा व नगरपालिकेच्या गलथान कारभाराची दिशा दिसत नाही का? बीड शहराच्या विकासाची दशा व दिशा कळत नाही का? बीडची जनता अनंत समस्यांना रोज झुंजत आहे, प्रश्न सुटत नाहीत. सुटण्याचा काही मार्ग दिसत नाही. समस्या सोडविण्यासाठी कोणी वाली नाही. या पार्श्वभूमीवर बीडचा विकास कधी करणार असा सवाला नितीन जायभाये यांनी केला असून, मेळाव्यांच्या नौटंकी पेक्षा बीडकरांच्या मूलभूत सुविधांचे व विकासाचे प्रश्न ज्वलंत नाहीत का, असा संतप्त सवाल बीड शहर बचाव मंचाकडून उपस्थित करण्यात आला आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या एका पत्रकात नितीन जायभाये यांनी पुढे म्हटले आहे की, एकीकडे प्रशासकीय अधिकाऱ्यांची मनमानी व भ्रष्टाचाराचा कळस उभा राहिला आहे. दुसरीकडे नेते हे बीड च्या स्थानिक स्वराज्य संस्थांना लोचून-लुचून खात आहेत. पुढाऱ्यांनी, मोठमोठ्या घराण्यांच्या राजपुत्र वारसांनी भ्रष्टाचाराचा कहर माजवला आहे. आई-बहिणीच्या अब्रूंची किंमत राहिली नाही. बीड जिल्ह्यात महिलांवरील अत्याचारांना काही सीमाच उरलेली नाही. आया - बहिणींवरील अत्याचारांचे दररोज नवनवीन प्रकरणे उघडकीस येताना दिसत आहेत. कायदा-सुव्यवस्थेचा धाकच राहिलेला दिसत नाही. विकासाची कामे रेंगाळत चाललेली आहेत. रेंगाळलेल्या रस्त्यांच्या कामांमुळे अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. बीड शहरातील सर्व प्रशासकीय कारभाराचे तीन तेरा वाजलेले असून, याला भ्रष्टाचारी अधिकारी व नेते कारणीभूत आहेत. हे सर्व प्रश्न सोडवण्यापेक्षा सत्ताधारी नेत्यांना कार्यकर्त्यांचे रुसवे फुगवे काढणे हेच महत्त्वाचे वाटत आहे. निवडणुका आल्यामुळे पक्ष



बांधणी महत्त्वाची वाटते, पण विकासाची बांधणी करताना सत्ताधारी नेहमीच कमी पडताना दिसत आहेत. नुसताच आश्वासनांचा भडीमार, जुमलेबाजी आणि प्रत्यक्ष विकास कामांच्या नावाने शंख हीच कार्यपद्धती झालेली आहे. कधी विकासावरही चर्चा करा, विकासासाठी मेळावे घ्या, भ्रष्टाचार संपवण्यासाठीही मेळावे घ्या. अशा विविध विषयांवर बीड शहर बचाव मंच कडून सत्ताधारी आणि पुढाऱ्यांना प्रश्न करण्यात आले आहेत.

# नवीन कायद्यामुळे लोकशाही मजबूत होईल -ॲड. सालपे

## जय भवानी महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले नवीन कायदे या विषयावर हे कार्यशाळा संपन्न झाली या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणून धर्मदाय आयुक्त बीड येथे कार्यरत असलेले अँड उदयसिंह सालपे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रभारी प्राचार्य सोमनाथ घाडगे सर प्रमुख पाहुणे म्हणून माननीय बबनराव काकडे प्राध्यापक वंदन जाधव प्रा विनोद किरदक व्यासपीठावर उपस्थित होते सर्वप्रथम मान्यवरांचा महाविद्यालयाच्या वतीने विभागाच्या वतीने सत्कार




करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ लोखंडे यांनी केले अलीकडच्या काळात उदयास आलेल्या नवीन कायदेविषयक माहिती दिली प्रमुख पाहुणे अँड उदयसिंह सालपे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना अलीकडच्या काळात समान नागरी कायदा वन इलेक्शन नेशन अशा कायद्याबाबत चर्चा होत आहे ही नवीन कायदे अस्तित्वात आली तर भारताचे लोकशाही अधिक मजबूत होईल असे मत त्यांनी व्यक्त केले तर प्रमुख पाहुणे माननीय बबनराव काकडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना कार्यशाळेला शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी संविधानाचा अभ्यास करून अस्तित्वात आलेल्या नवीन कायद्याचे अध्ययन करून कायद्याची अंमलबजावणी करण्याचे आव्हान केले या कार्यक्रमात आय क्यू एस सी समन्वयक प्राध्यापक विनोद किर्तन यांनी आपले मनोगत व्यक्त केले संविधानात असलेले कायदे आपल्या जीवनात परिवर्तन घडवून आणतात त्यामुळे कायद्याचा अभ्यास करून त्याची आपण अंमलबजावणी केली पाहिजे असे आवाहन केले या कार्यक्रमाचे आभार प्रा डॉ वंदन जाधव यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा शिवाजीराव काकडे प्रा संदीपान किवणे सर यांनी मोलाचे सहकार्य केले या कार्यशाळेसाठी राज्यशास्त्राचे सर्व विद्यार्थी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सुखसागर हॉटेलवर पोलिसांचा छापा

## सहा जुगारी पकडले; ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील अनेक लॉजेसवर राजरोसपणे अवैध धंदे सुरू असून शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकात असलेल्या हॉटेल सुखसागर या आलिशान हॉटेलवर पोलिसांनी दि १९ जुलै शनिवार रोजी रात्री छापा टाकला,त्या ठिकाणी एका रूम मध्ये जुगार खेळताना शहरातील बड्या लोकांची सहा मुल पोलिसांना आढळून आली असून त्यांच्या ताब्यातून जुगार साहित्यासह ८ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.या प्रकारामुळे शहरात खळबळ उडाली असून या छाप्याची शहरात चवीने चर्चा होत आहे.




शहरातील अनेक लॉजेसवर राजरोसपणे अवैध धंदे बिनधास्तपणे सुरू आहेत.त्यातच शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकात असलेल्या आलिशान सुखसागर या हॉटेलमध्ये जुगार खेळला जात असल्याची माहिती शहर पोलिसांना मिळाल्याने दि १९ जुलै शनिवार रोजी रात्री ८:३० वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी तेथे छापा टाकला, त्यावेळी तेथील रूम नंबर २०१ मध्ये परिक्षीत सिद्धेश्वर जाधव,स्वप्निल अमरनाथ खुरपे,श्रीधर अशोक रांजवण,विश्वजीत प्रताप रांजवण,पृथ्वीराज रघुनाथ शेजुळ,मनोज विठ्ठल सोळंके हे बड्या घरचे सहा तरुण तिरट नावाचा जुगार खेळत असल्याचे आढळून आले.यावेळी पोलिसांनी जुगाराच्या साहित्यासह ८ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.या जुगाऱ्यांना शहर पोलीस ठाण्यात आणून त्यांचे विरुद्ध मुंबई जुगार कायद्यान्वये कारवाई केली. छाप्याची ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक के.बी.माकणे, हवालदार शेख अस्लम,महेश चव्हाण,अंगद घोडके,सुनील गवळी यांनी केली.

दरम्यान या हॉटेलमध्ये राजरोसपणे जुगार व इतर अवैध धंदे सुरू असल्याची चर्चा आहे.दररोज हॉटेलच्या रूममध्ये जुगार खेळण्यासाठी मोठ्या संख्येने लोक येतात, यामध्ये काही राजकीय मंडळी देखील येत असतात.मात्र हॉटेल व्यवस्थापक सुरेश पुजारी यांनी आम्ही एका व्यक्तीच्या नावावर आधार कार्ड घेऊन रूम देतो,आता काय चालले माहिती नाही असे म्हणून हात झटकत असल्याने हॉटेल चालकावर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# रा.काँ.चे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांचा डॉ.योगेश क्षीरसागरांकडून सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी रविवारी (दि.२०) बीड शहरातील डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या संपर्क कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. या भेटीनिमित्त डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते खा.तटकरे यांचा सत्कार करण्यात आला.**



यावेळी माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, आमदार विक्रम काळे, आनंद परांजपे, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे, लतिफ तांबोळी, जिल्हाध्यक्ष अ‍ॅड.राजेश्वर चव्हाण, माजी आमदार संजय दौंड, महिला आघाडीच्या अ‍ॅड. प्रज्ञा खोसरे, रमेश आडसकर, युवा नेते बळीराम गवते, अविनाश नाईकवाडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे आजी-माजी पदाधिकारी, माजी नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भेटीदरम्यान आगामी संघटनात्मक कामकाज, पक्ष विस्तार, तसेच स्थानिक प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

# पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त नवनाथ शिरोळे यांच्या हस्ते कापडी पिशव्यांचे वाटप

**उपसरपंच गणेश लांडे यांच्याकडून प्लास्टिक मुक्तीचा निर्धार!**

बीड । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय नेत्या नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू असलेल्या सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पर्यावरणपूरक व जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. गणेश लांडे यांच्या पुढाकाराने व संकल्पनेतून राबवलेल्या या उपक्रमात कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करून प्लास्टिक मुक्त बीड करण्याचा निर्धार करण्यात आला.



या उपक्रमाचे उद्घाटन नवनाथ अण्णा शिरोळे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाला बीड जिल्हा सचिव शांतिनाथ डोरले, अनिल चांदणे, राजू शहाणे, बाबूलाल डोरमारे, महादेव नागरगोजे, नरेश पवार, राजेश चरखा, बाबुराव परळकर, प्रितताई कुकडेजा, शेख अम्मू, शेख मामू यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना गणेश लांडे यांनी सांगितले की, ''पंकजाताई मुंडे यांच्या सामाजिक कार्याची प्रेरणा घेऊन सेवा पंधरवडा अंतर्गत हा उपक्रम राबवला आहे. प्लास्टिकचा वापर टाळून ◀◀ पान ३ वर

# अवैधरीत्या देशी, विदेशी, गावठी दारु विक्री करणाऱ्या विरुध्द शहर पोलीसांची कारवाई

## ७ जणांविरोधात गुन्हे दाखल;१ लाख ३६ हाजाराचा मुद्देमाल जप्त

माजलगांव । प्रतिनिधी

येथील शहर पोलीसांनी पोलीस ठाणे हद्दीत दि १९ जुलै शनिवार रोजी विशेष मोहीम राबवुन छुप्या पध्दतीने चालु असलेले देशी, विदेशी व हातभट्टीचे अड्डे उध्वस्त करण्यासाठी पोलीस ठाणे स्तरावर विविध पथके तयार करुन सकाळी ०६:०० ते ०८:०० वाजण्याचे दरम्यान पोलीस स्टेशन



माजलगांव शहर हद्दीमध्ये विविध ठिकाणी छापे मारुन अवैधरीत्या दारु विक्री करणारे निर्मलाबाई भागवत मेंडके रा. रमाईनगर माजलगांव,लक्ष्मण ज्ञानु चव्हाण रा. तानाजीनगर माजलगांव, भगवान कटाळु मेंडके रा. शिवाजीनगर माजलगांव,अरुण केशव साळवे रा. रमाईनगर माजलगांव, ◀◀ पान ३ वर

# बळीराम गवतेंवर राष्ट्रवादीच्या युवक जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी

बीड । प्रतिनिधी

प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी बळीराम गवते यांच्या कामाची दखल घेत दि.२० जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करून युवकाची जबाबदारी दिली



बळीराम गवते यांनी बीड पंचायत समितीच्या माध्यमातून मतदारसंघात स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. याच कामाचे मुल्यमापन पक्षाकडून होत असून राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बळीराम गवते यांनी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सकाळी ९ वाजता युवा संवाद मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्यास अफाट गर्दी पाहून अजित पवार यांनी सलग तासभर युवकांशी संवाद साधला होता. दि.२० जुलै रोजी पुन्हा याच ठिकाणी निर्धार नवपर्वाचा, पदाधिकारी सवांद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे,

# अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जाधव यांनी पदभार स्वीकारला

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्या जागी बदलून आलेले धाराशिव जिल्हा परिषदेचे अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही.पी. जाधव यांनी शुक्रवार दिनांक १८ जुलै २०२५ रोजी पदभार स्वीकारला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी त्यांचे स्वागत केले.



महाराष्ट्र विकास सेवा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकल्प संचालक गट संवर्गाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाने दिनांक १५ रोजी काढले होते. बीड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य ◀◀ पान ३ वर



**परळी : निर्धार नवपर्वाचा या यात्रे दरम्यान परळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शहराध्यक्ष पदी बाजीराव धर्माधिकारी यांना नियुक्तीचे पत्र देताना प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे,माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, आ.विक्रम काळे,महिला अयोगाच्या प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर आदी पदाधिकारी**

# प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसच्या निर्धार नवं पर्वाचा या अभियानातर्गत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा सुनील तटकरे यांचा राज्यव्यापी दौरा चालू आहे. त्यानिमित्ताने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस हे अभियान राबवित आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष ना अजितदादा पवार यांच्या आदेशानुसार तसेच या मोहिमेच्या नियोजित कार्यक्रमानुसार राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा सुनील तटकरे, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे,आमदार विक्रम काळे, मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण हे बीड येथील आपला नियोजित कार्यक्रम आटोपून अंबाजोगाई येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.



यावेळी राजकिशोर मोदी यांच्या वतीने सर्व मान्यवरांचे स्वागत या सन्मान केला. या भेटीमध्ये प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी अंबाजोगाई राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याची माहिती घेतली. त्याचबरोबर आगामी काळात येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक संदर्भात सखोल असा विचारविनिमय करण्यात आला. प्रदेशाध्यक्ष खा सुनील तटकरे यांनी यावेळी अंबाजोगाई शहर व परिसरात राजकिशोर मोदी यांनी मागील वीस ते पंचवीस वर्षांपासून अंबाजोगाई नगर परिषदेच्या माध्यमातून केलेल्या विकासकामांची प्रशंशा केली. यापुढेही राजकिशोर मोदी यांना आगामी काळात येणाऱ्या प्रत्येक कार्यासाठी ना अजितदादा यांच्या माध्यमातून आपला संपूर्ण पाठिंबा असेल असेही अभिवाचन खासदार सुनील तटकरे यांनी दिले. यावेळी राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी संकेत मोदी, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड जिल्हा अध्यक्ष राजेश्वर चव्हाण, माजी आमदार संजय दौंड, अंबा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष रमेश आडसकर, मनोज लखेरा,बबन लोमटे, महादेव आदमाणे, अमोल लोमटे,दिनेश भराडीया, धम्मा सरवदे, डॉ राजेश इंगोले, किशोर परदेशी, , माणिक वडवनकर , पंडित हलगुंडे, , भीमसेन लोमटे, गोविंद पोतंगले, राजू मोरे,जावेद गवळी, सचिन जाधव, शुभम लखेरा, यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर आक्षेपार्ह बोलणाऱ्यावर कारवाई करा

माजलगाव । प्रतिनिधी

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विषयी आक्षेपार्य बोलणाऱ्या समाजकंटकावर पोलिसात गुन्हा नोंद करून त्याला अटक करावी अशी मागणी माजलगाव तालुका सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने माजलगाव शहर पोलीस ठाण्यात एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पोलिसात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की धनगर समाज बांधव व बहुजन समाज बांधव यांच्यातर्फे विनंती करण्यात येते कि, दि. १८/०७/२०२५ रोजी



सुनील गोपाळराव उभे या माथेफिरू इसमाने फेसबुकवरील व्हिडीओ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर अश्लील भाषेत टीका केली. यामुळे समस्त बहुजन बांधवाच्या आणि महाराष्ट्रातील जनतेच्या भावना दुखावल्या गेल्या आणि तीव्र स्वरुपात संताप झाला, तरी सदरील इसमावर आपण कडक कारवाई करावी जेणे करून पुन्हा महाराष्ट्रातील कोणत्याही थोर महापुरुषावर कोणी अश्लील भाषा वापरणार नाही. या आरोपीवर कडक कारवाई न झाल्या धनगर समाज व बहुजन समाजाच्या वतीने राज्यभर आंदोलन करण्यात येईल. असे निवेदन माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे एपीआय प्रल्हाद मुंडे यांना देताना माजलगाव तालुका सकल धनगर समाजाचे ज्ञानेश्वर नाना सरवदे, अविनाश कांडुरे, विलास नेमाने, दत्त नाना येवले, शंकरराव गावडे, सरपंच राज अर्जुन ,सरपंच सुखदेव मुळे ,रोहित वगरे, विशाल देवकते ,हरी गलांडे, दत्ता आबुज, शिव प्रसाद आबुज ,हनुमान गावडे ,तुषार जाधव ,सुग्रीव जावडे, केतन धापसे ,व सर्व समाज बांधव उपस्थित होते

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी अमर नाईकवाडे



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा दि.२० जुलै रविवार रोजी निर्धार नवपर्वाचा पदाधिकारी संवाद मेळाव्याचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, माजी मंत्री धनंजय मुंडे, माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या सुचनेवरून जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनी नगरसेवक अमर नाईकवाडे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शहराध्यक्षपदी निवड केली. यावेळी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र दिले गेले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच यावेळी निर्धार नवपर्वाचा पदाधिकारी संवाद मेळावा कार्यक्रमास ना. धनंजय मुंडे साहेब, महिला आयोग अध्यक्ष रुपाली ताई चाकणकर, युवक प्रदेश अध्यक्ष सूरज चव्हाण, मा. खा.आनंद परांजपे, सामाजिक न्याय प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे,ओबीसी सेल प्रदेशाध्यक्ष कल्याण काका आखाडे, बाळासाहेब आजबे, आ.विजयसिंह ◀◀ पान ३ वर

# पवार, मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित आरोग्य शिबिरास प्रतिसाद

## शिबिरात २२३ रूग्णांची मोफत तपासणी - डॉ.राजेश इंगोले यांची माहिती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार, दिनांक २० जुलै रोजी अंबाजोगाईत भव्य आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या भव्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असल्याचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. तर मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ




तब्बल २२३ रूग्णांनी घेतला असल्याची माहिती आयोजक राजकिशोर (पापा) मोदी मित्र मंडळाच्या वतीने देण्यात आली आहे.

शहरातील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या समाधान मानसोपचार रूग्णालय व व्यसनमुक्ती केंद्र व नेत्रालय, हाऊसिंग सोसायटी, पंचायत समिती जवळ, अंबाजोगाई या ठिकाणी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार, दिनांक २० जुलै रोजी अंबाजोगाईत भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या मोफत शिबिरात व्यसनमुक्ती शिबीर, मोतीबिंदू निदान व शस्त्रक्रिया शिबीर, मतिमंदत्व तपासणी व प्रमाणपत्र वाटप, पत्रकार आरोग्य तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.बालासाहेब लोमटे, तर उदघाटक म्हणून नेत्ररोग विभाग प्रमुख डॉ.ज्ञानोबा दराडे आणि प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यकीय अधीक्षक डॉ.चंद्रकांत चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात हृदयरोग तज्ज्ञ डॉ.शेख ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
सोमवार, दि.२१ जुलै २०२५ । पान ७

# कोंडवाडे बांधण्याकरिता जागा निश्चिती, प्रस्ताव द्या

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून बारामतीत विकासकामांची पाहणी

बारामती । प्रतिनिधी

शहरात भटकी जनावरे आणि कुत्रे याबबत नागरिकांच्या तक्रारी गांभीर्याने घेत नगरपरिषदेने बंदोबस्त करावा, त्यासाठी शहरातील विविध भागात कोंडवाड्याकरिता जागा निश्चित करून प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले. बारामतील श्री सिद्धेश्वर मंदिर परिसर, दशक्रिया घाट, शारदा प्रांगण येथील सुरूअसलेली विविध विकास कामे, माळावरची देवी ते जळोची चौक रस्ता, जळोची कॅनाल पुलावरून संभाजीनगरकडे जाणारा रस्ता, कॅनाल लगतची गार्डन जागा, जळोची ओढ्याशेजारील दशक्रिया घाट, दहन-दफनभूमी जागा, रुई हद्दीतील विद्या प्रतिष्ठान शेजारील दोन लहान पूल, गार्डन, स्मशानभूमी, पूर संरक्षण भिंतीच्या प्रस्तावित जागेची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून पाहणी केली.



प्रस्तावित जागेवर करण्यात येणाऱ्या कामांची पाहणी करुन पवार म्हणाले, बारामती परिसरातील हद्दवाढ लक्षात घेता प्रस्तावित जागेवर कामे सुरु करावीत. कामात अडथळा आणणाऱ्यावर पोलिसांनी कारवाई करावी. या परिसरातील रुई-जळोची ओढा रुंदीकरणाची कामे करताना मोजणी करुन त्यामध्ये अतिक्रमण असल्यास ती काढावीत. या ओढ्याच्या दोन्ही बाजूस पूर संरक्षण भिंतीचे बांधकाम करावे.

शारदा प्रांगण परिसरात उभारण्यात येणाऱ्या सीबीएसई आणि मराठी शाळेत विद्यार्थी व शिक्षकांना लागणाऱ्या पायाभूत सुविधांचा विचार करुन इमारत व परिसर विकसित करा. पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांकरिता सुविधांचा करुन शौचालय, पाणी, विद्युत व्यवस्था आदींच्या अनुषंगाने कामे करावीत. कविवर्य मोरोपंत यांच्या स्मारकाची आवश्यक ती डागडुजी करुन घ्यावी.

यावेळी उपमुख्यमंत्री कार्यालयाचे उपसचिव विकास ढाकणे, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, महावितरणचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार गणेश शिंदे, गट विकास अधिकारी किशोर माने, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे, आदर पुनावाला क्लीन सिटी इनिसिएटिवचे मुख्य कामकाज अधिकारी मल्हार करवंदे, श्री सिद्धेश्वर मंदिरचे विश्वस्त समीर दाते आदी उपस्थित होते.

### ग्लूटन लिटर पिकिंग मशीन

आदर पूनावाला स्वच्छ शहर उपक्रमा अंतर्गत स्वच्छतेकरिता ४ ग्लूटन लीट्टर पिकिंग मशीन देण्यात आल्या आहेत, उपमुख्यमंत्री पवार यांच्या उपस्थितीत नगरपरिषदेच्या सेवेत त्या दाखल करण्यात आल्या.

# आंबेगावच्या पूर्व भागात बिबट्यांचा वावर वाढला; शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

आंबेगाव । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी, धामणी, पहाडधरा, शिरदाळे, वडगावपीर, मांदळेवाडी, तसेच वाळुंजनगर व खडकवाडी या बागायती पट्ट्यात बिबट्यांच्या वाढत्या वावरामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषत: शेतकरीवर्ग धास्तावलेला असून, वन विभागाकडे तातडीने पिंजरे लावून बिबट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.



गेल्या चार महिन्यांपासून खडकवाडी-लोणी तसेच लोणी-सविंदणे रस्त्यावर बिबट्यांच्या दर्शनाच्या अनेक घटना घडल्या आहेत. काही वेळा बिबट्यांनी दुचाकीस्वारांवर झडप घालण्याचा प्रयत्न केला आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी जीवघेण्या प्रसंगांमुळे नागरिक भयभीत झाले आहेत. लोणी व धामणीच्या डोंगराळ परिसरात बिबट्याने अनेकदा शेळ्या-मेंढ्यांवर हल्ले करून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान केले आहे. नुकतीच धामणीतील खंडोबा मंदिर परिसरात बिबट्याने एक शेळी ठार केली.

महिन्यापूर्वी वाळुंजनगर येथे लावलेल्या पिंजऱ्यात एक मादी बिबट्या व तिचा बछडा जेरबंद झाला. त्यानंतर पुन्हा दोन दिवसांनी एक बछडा वेगळ्या पिंजऱ्यात अडकला. त्यामुळे वन विभाग एका गावातून पकडलेल्या बिबट्याला दुसऱ्या गावात सोडत तर नाही ना? असा संशय व्यक्त होत आहे.

याशिवाय, बिबट्यांच्या हल्ल्यात जनावरे ठार झाल्यास मिळणारी भरपाई अत्यंत कमी असून, तीही वेळेवर मिळत नसल्याबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. मानवी जखमींच्या बाबतीतही वन विभागाकडून उपचार खर्चाबाबत अपुरा प्रतिसाद मिळतो, असेही नागरिकांचे म्हणणे आहे.या पार्श्वभूमीवर वन विभागाने अधिक दक्षता घेणे, त्वरित पिंजरे लावणे आणि भरपाई प्रक्रिया गतिमान करणे गरजेचे असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

# विठ्ठल रुक्मिणी मंदिरात प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण

## विठ्ठल बाग येथे उपक्रम : नागरिक, भाविकांची गर्दी

माळेगाव । प्रतिनिधी

बारामती शहरालगत गोजुबावी रोड येथे ४२ ग्रीन पार्कसमोर नवजीवन ग्रुपकडून बांधण्यात आलेल्या विठ्ठल बाग या ठिकाणी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा व हजारो नागरिकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी नागरिक आणि भाविकांनी मोठी गर्दी केली होती. संपूर्ण परिसर भक्तिरसात चिंब झाला होता. शहरालगत गोजूबावी रोड याठिकाणी नवजीवन ग्रुपकडून ३० एकरांमध्ये प्लॉटिंग उभारण्यात आले होते. त्यावेळी नवजीवन समूहाने ४१ फूट उंचीची भव्य विठ्ठल मूर्ती त्या ठिकाणी उभारून दिली होती. या मूर्तीच्या उभारणीवेळी नवजीवन ग्रुपने ग्राहकांना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर उभारून देण्याचे आश्वासन दिले होते. याची परिपूर्ती (दि.१८) रोजी झाली. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा करून हजारो नागरिकांना महाप्रसादाचे आयोजन करून पूर्ण केले.



यापूर्वी १७ जुलै २०२४ रोजी आषाढी एकादशीदिवशी नवजीवन ग्रुपने याठिकाणी ४१ फुटी भव्य विठ्ठल मूर्ती उभारली होती. त्यानंतर एक वर्षाने (दि.१८) रोजी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा झाल्याने नवजीवन ग्रूपने उभारलेल्या विठ्ठल बाग याठिकाणी प्लॉट खरेदी केलेल्या ग्राहकांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी नवजीवन ग्रुपचे संचालक शितल आप्पा लोखडे, जयदीप दिलीपराव तावरे, संतोष जाधव, कांतीलाल काळे, महेश भगत, विकास बाबर, हेमंत गरगटे, पंकज भोसले, निलेश कोकरे, अमिर शेख, राहुल चव्हाण, वैभव बंडगर, बाळासाहेब नलवडे, विठ्ठल बाग प्लॉटिंग येथे प्लॉट खरेदी केलेले ग्राहक व हजारो नागरिक उपस्थित होते.

### नवजीवन ग्रुपचा सामाजिक, अध्यात्मिक वारसा

नवजीवन ग्रुपने पुणे, सातारा परिसरात प्लॉटिंग क्षेत्रात ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. नवजीवन ग्रुपने नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत एक अध्यात्मिक वारसा जपला आहे. समाज आणि ग्राहकांप्रती त्यांची आत्मीयता कायम राहिली आहे. त्यामुळे त्यांनी बारामती, सातारा जिल्ह्यात विश्वासार्हता निर्माण केली आहे. त्यातच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्यातून ग्राहकांकडून नवजीवन ग्रुपच्या पसंतीस भर पडली आहे.

# पुरंदर किल्ल्याचा विकास आराखडा बनवावा; आमदार विजय शिवतारेंची मागणी

सासवड । प्रतिनिधी

किल्ले पुरंदरवर छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म झाला. छत्रपती संभाजी महाराजांवर देशभरात लोकांची विशेषतः युवकांची प्रचंड श्रद्धा आहे. या श्रद्धेपोटी लाखो शंभूप्रेमी पुरंदर किल्ल्यावर जाऊन राजांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक होतात. अशा या पुरंदर किल्ल्याचा विकास आराखडा बनवावा, अशी मागणी आमदार विजय शिवतारे यांनी विधानसभेत केली.



या किल्ल्यावरील महाराजांचे जन्मठिकाण, ज्या वाड्यात ते प्रत्यक्ष राहिले ते ठिकाण, किल्ल्यावरील पुरातन महादेव मंदिर, केदारेश्वराचे मनमोहक आणि अत्यंत प्राचीन मंदिर, मुरारबाजी देशपांडे यांनी किल्ल्यावर गाजवलेले शौर्य, बाजूलाच असलेला वज्रगड हा पुरंदरचा जोडकिल्ला, भैरवखिंडीतून वज्रगडावर जाणारी वाट, किल्ल्यावरील मोठमोठी दगडी प्रवेशद्वारे, तटबंदी, जमीनदोस्त झालेली राजगादी, ढासळलेले बुरूज या सर्वांचे जतन करणे आवश्यक आहे. त्यासाठी किल्ल्याचा सर्वंकष विकास आराखडा तयार करण्याचे आदेश पुरातत्व विभाग आणि पुणे विभागीय आयुक्तांना द्यावेत, अशी मागणी आमदार विजय शिवतारे यांनी विधिमंडळात केली.

या वेळी सभागृहात औचित्याच्या मुद्द्याआधारे शिवतारे यांनी पुरंदर किल्ल्याचा विषय सभागृहात मांडला. शिवतारे म्हणाले, पुराणात पुरंदर म्हणजे साक्षात इंद्र असा उल्लेख आहे. पुरंदर पर्वताला इंद्रनील पर्वत असे संबोधण्यात आलेले आहे.

हा किल्ला राष्ट्रकूट राजांच्या काळात म्हणजे ७ व्या शतकात बांधलेला असून, पुढे तो बहामनी राजांच्या ताब्यात गेला. याच काळात त्याचे नूतनीकरण करण्यात आले. त्यानंतर तो निजामशाही, आदिलशाही करीत हिंदवी स्वराज्यात सामील झाला.छत्रपती शिवाजी महाराजांची पहिली लढाई याच किल्ल्यापासून अवघ्या काही अंतरावर खळद-बेलसर परिसरात झाली. पुरंदरचा ऐतिहासिक तह, मुरारबाजीचे शौर्य, संभाजी महाराजांची जडणघडण अशी प्रचंड मोठी पार्श्वभूमी या किल्ल्याला लाभलेली आहे. सध्या किल्ल्यावरील जुनाट अवशेष भग्न अवस्थेत आहेत.देशभरातील शंभूभक्तांची या किल्ल्याच्या डागडुजी करावी, अशी मागणी आहे. हे सर्व लक्षात घेऊन या किल्ल्याचे जतन करण्यासाठी सर्वंकष विकास आराखडा बनवण्याचे आदेश पुरातत्व विभाग, विभागीय आयुक्त, पुणे आणि जिल्हाधिकारी, पुणे यांना होणे आवश्यक आहे.शिवतारे म्हणाले, शिवनेरी किल्ल्यावर राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व अनेक मंत्री यांच्या उपस्थितीत शिवजन्मसोहळा संपन्न होत असतो. त्याच पद्धतीने पुरंदर किल्ल्यावर शासकीय पद्धतीने होणाऱ्या संभाजी महाराज जयंतीसाठी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्रीव मंत्री यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. शासनाने याबाबत आपली भूमिका जाहीर करावी आणि किल्लासंवर्धनासाठी विकास आराखडा तत्काळ बनवण्याचे आदेश द्यावेत.

# आम्हीच इथले भाई, पुण्यात पुन्हा कोयता घेऊन तरुणांचा हैदोस

## १० ते १२ वाहनांची तोडफोड, व्हिडीओ व्हायरल

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात वारंवार कोयता गँगची दहशत चर्चेत असताना पुन्हा एकदा किरकोळ कारणावरून कोयते उपसत तरुणांनी दहशत माजवल्याचा प्रकार समोर आला आहे. आम्हीच इथले भाई म्हणत तरुणांच्या जमावाने १०-१२ गाड्या फोडल्याचा प्रकार समोर आल्याने मोठी खळबळ उडाली.



पुण्यातील भवानी पेठ परिसरात पुन्हा एकदा कोयत्याने दहशत माजवणाऱ्या टोळक्याने शहराच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. किरकोळ कारणावरून संतप्त झालेल्या काही तरुणांनी हातात कोयते आणि तलवारी घेत परिसरात हिंसाचार घडवून आणला. या तरुणांनी थेट रस्त्यावर उतरून जवळपास १० ते १२ दुचाकी आणि चारचाकी वाहनांची तोडफोड केली. घटनेचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये हे तरुण ''आम्हीच इथले भाई, आमच्या नादी कोणी लागू नये'' असा इशारा देत माजवलेल्या दहशतीमुळं नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, दोन गटांमध्ये किरकोळ वाद झाला होता. मात्र, हा वाद काही तासांतच हिंसक वळणावर गेला. मध्यरात्रीच्या सुमारास या तरुणांनी जमाव करून हातात धारदार शस्त्र घेऊन परिसरात दहशत निर्माण केली. त्यांनी रस्त्यावर उभ्या असलेल्या अनेक वाहनांवर जोरदार हल्ला चढवत तोडफोड केली.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. या प्रकारामुळे भवानी पेठ परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी परिसरात बंदोबस्त वाढवून नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.

# शंकर महाराज मठाजवळ 'गुरुजी'कडून विनयभंगाचा प्रयत्न; गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

''विशेष औषध'' आणि ''भविष्यवाणी''च्या आमिषाने एक विद्यार्थीनीला एकटं बोलावून विनयभंगाचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार सहकारनगर परिसरातील शंकर महाराज मठाजवळ उघडकीस आला आहे. एलएलबीचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनीच्या तक्रारीवरून अखिलेश राजगुरु या तथाकथित गुरुजीविरुद्ध सहकारनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पीडित गेल्या वर्षभरात आपल्या कुटुंबासह चार-पाच वेळा या गुरुजींकडे गेल्या होत्या. त्यांच्याच सांगण्यावरून त्यांनी १२ जुलै रोजी भावाची पत्रिका दाखवण्यासाठी भेट घेतली. त्या वेळी ''विशेष वनस्पतीचे औषध'' देण्याचे सांगून पुढच्या शनिवारी एकटं यायला सांगण्यात आले.

१८ जुलै रोजी व्हॉट्सॲपवर ''वस्तू आली आहे, ६ वाजेपर्यंत एकटं या'' असा स्पष्ट संदेश पाठवण्यात आला. बहिणीसोबत यायच्या इच्छेवर गुरुजींनी ''तिला मठात पाठवा, तुम्ही एकटं या'' असा आग्रह धरला.

१९ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता पीडित गुरुजींच्या कार्यालयात गेल्या असता तेथे इतर कोणीही नव्हते. ''पडद्यामागे डोक्यावर वस्तू ठेवून मंत्र म्हणावे लागतील'' असे सांगून त्यांनी अश्लील वर्तन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पीडितने सावधगिरी बाळगून त्वरित विरोध केला आणि बाहेर निघून गेल्या. नंतर पोलिसांकडे धाव घेत गुन्हा नोंदवला.

# माऊलींची पालखी भक्तिमय वातावरणात अलंकापुरीत परतली

आळंदी । प्रतिनिधी

आळंदीच्या वेशीकडे भाविकांची लागलेली नजर अन टाळ-मृदूंगाचा शिगेला पोहोचलेला गजर अशा भक्तीमय वातावरणात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची पालखी साधारण एक महिन्याचा पायी प्रवास करीत, पंढरीच्या विठुरायाची भेट घेऊन रविवारी (दि. २०) सायंकाळी साडे सहाच्या सुमारास अलंकापुरीत परतली. माऊलींच्या पालखीचे आळंदीकरांनी जंगी स्वागत केले. पालखीसह शेकडो वारकरी व भाविकांच्या सोबत टाळ-मृदंगाचा गजर करीत संतजनांचा मेळा रविवारी अलंकापुरीत दाखल होणार असल्यामुळे पालखी मार्गावर रस्त्यांच्या दोन्ही बाजूस स्वागतासाठी मोठ्या प्रमाणात भाविक उपस्थित होते. महाद्वार चौक, नगरपालिका चौकात रांगोळीच्या पायघड्या घालण्यात आल्या होत्या. नागरिकांच्या वतीने माऊलीच्या पालखीवर फुलांची उधळण केली जात होती. पालखी वडमुखवाडी परिसरात आल्याचा निरोप आळंदी मार्गावरील भाविकांना समजताच भाविकांनी पालखीच्या स्वागतासाठी पायी चालत जाऊन स्वागत केले.पालखी नगरपालिका चौक, इंद्रायणी घाट मार्गे हरिहरेंद्र मठ, महाद्वारातून देऊळवाड्यात विसावली. पालखीचे मंदिर परिसरात आगमन होताच येथेही भाविकांनी जोरदार स्वागत केले. त्यानंतर पालखीची विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली. सोमवारी एकदशीला पालखीची नगरप्रदक्षिणा होणार असून त्यानंतर यंदाच्या पालखी सोहळ्याची सांगता होणार आहे.



### माऊलींची काढली दहीभाताने दृष्ट

माऊलींची पालखी अलंकापुरीच्या वेशीवर आल्याचे समजताच देवस्थान कमिटीच्या वतीने संभळ, टाळ-मृदुंगाच्या गजरात पालखीस परंपरागत सामोरे जात स्वागत करण्यात आले. यावेळी दहीभाताने माऊलींची दृष्ट काढण्यात आली.

# शिक्रापूर-न्हावरे महामार्गावरील धुळीच्या त्रासाने नागरिक त्रस्त; दिला आंदोलनाचा इशारा

शिरूर । प्रतिनिधी

तालुक्यातील शिक्रापूर ते न्हावरे दरम्यान सुरू असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामामुळे नागरिकांना धुळीच्या वावटळीतून प्रवास करावा लागत आहे. गेल्या काही महिन्यांपासून चालू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे स्थानिक रहिवासी आणि प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पावसाने विश्रांती घेतल्याने रस्त्यावर पाण्याचा वापर कमी झाला असून, वाहनांमुळे उडणाऱ्या धुळीमुळे सर्दी, खोकला, डोळ्यांची जळजळ आणि घशाचे त्रास वाढले आहेत.

दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग अत्यंत धोकादायक बनला असून, धुळीमुळे दृश्यता कमी होऊन अपघातांचा धोका वाढला आहे. रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्यासाठी माळवाडी ते न्हावरे हा संपूर्ण रस्ता खोदण्यात आला आहे, परंतु कॉंक्रिटीकरणाचे काम अद्याप सुरू झालेले नाही, त्यामुळे धूळ उडण्याचे प्रमाण वाढले आहे.

### शेतकऱ्यांचेही नुकसान

रस्त्यावरील धूळ शेतातील पिकांवर साचून



प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया मंदावत आहे, ज्यामुळे पिकांची वाढ खुंटते आणि रोगराई वाढून उत्पन्न घटते. धुळीमुळे झाडांच्या छिद्रांमध्ये अडथळा निर्माण होऊन वायूंची देवाणघेवाण कमी होते, याचा थेट परिणाम शेतीवर होत आहे.

### नागरिकांचा संताप आणि यंत्रणांचे दुर्लक्ष

नागरिकांचे म्हणणे आहे की, धूळ नियंत्रणासाठी दिवसातून ४-५ वेळा पाणी मारणे आवश्यक असताना, प्रत्यक्षात अत्यल्प पाण्याचा वापर होतो. ठेकेदार कंपनी आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत नागरिकांनी रास्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला आहे.

निखिल कन्स्ट्रक्शनचे जी.एम. अनिल दळवी यांनी सांगितले की, पाणी मारले जात आहे, परंतु नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेऊन पाण्याचे प्रमाण वाढवले जाईल.ही समस्या नागरिकांच्या आरोग्य आणि सुरक्षेशी निगडित आहे. संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना न केल्यास नागरिकांचा उद्रेक होण्याची शक्यता आहे. धुळीचा त्रास आंदोलनाच्या स्वरूपात तीव्र होण्यापूर्वी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.

# पोलीस हवालदाराने गळफास घेऊन संपवले जीवन

पुणे । प्रतिनिधी

वाहतूक शाखेतील पोलीस हवालदाराने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना लोहगाव भागात घडली. आत्महत्येमागचे कारण समजू शकले नाही. राजेंद्र विलास गायकवाड (४२, रा. डी वाय पाटील कॉलेजजवळ, धानोरी, लोहगाव) असे आत्महत्या केलेल्या पोलीस हवालदाराचे नाव आहे.



गायकवाड हे वाहतूक शाखेच्या नियंत्रण कक्षात नियुक्तीस होते. शनिवारी (१९ जुलै) गायकवाड यांची साप्ताहिक सुटी होती. त्यांची पत्नी दौंडला गेली होती. त्यांना १२ आणि १४ वर्षांची दोन मुले आहेत. मुले सकाळी शाळेत गेली होती.

सकाळी त्यांच्या पत्नीने मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. तेव्हा त्यांनी प्रतिसाद दिला नाही. मुले दुपारी शाळेतून घरी आले. तेव्हा घराचा दरवाजा आतून बंद होता. मुलांनी दरवाजा वाजविला. मात्र, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यांनी शेजाऱ्यांना या घटनेची माहिती दिली.

दरवाजा वाजवूनही त्यांनी प्रतिसाद न दिल्याने शेजाऱ्यांनी या घटनेची माहिती विमानतळ पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी दरवाजा उघडला. तेव्हा गायकवाड यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले.

गायकवाड यांच्या आत्महत्येमागचे निश्चित कारण समजू शकले नाही. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.